# हुं-दामो अन् चॅलेंज



म. ग्रं. सं. ठाणे
विषय कथा-प्रकार
क्र. ५७८

REFBK-0021579

अनिल वर्वे

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे; तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

24 NOV 1977
21 DEC 1977
28 DEC 1977
14 NOV 1979
27 FEB 1980
5 MAR 1980
17 APR 1985
30 APR 1985

[ क्र मा प. ]

# ‘ झू-दाओ अन् चर्चबेल्स ’

अनिल बर्वे

REFBK-0021579

विवस्वना प्रकाशन मुंबई ११.

किंमत पाच रुपये

विवस्वना प्रकाशन क्रमांक ४

प्रथमावृत्ती प्रकाशक मुद्रक
१५ फेब्रु. ७५ अनिल बर्वे य. पां. वेदरे
प्रतिसंख्या १६०० शाहीर अमरशेख मार्ग वैशाली प्रिंटर्स
जेकब सर्कल मुंबई ११. १५६३ सदाशिव, पुणे ३०

सर्वहक्क लेखका स्वाधीन

मुखपृष्ठ : शिवाजी कांबळे

महाराष्ट्रातील आदिवासींच्या मुक्तीसाठी अहर्निश झटणाऱ्या,

कॉ. गोदूताई परुळेकर, कॉ. धनगर, कॉ. बी. एम् नार्वेकर,

कॉ. लहानू कोम, कॉ. शरद पाटील आणि

शहाद्यातील कुमार शिराळकर आणि कंपनीला प्रेमपूर्वक !

— अनिल स. बर्वे

हें पुस्तक ‘उगवतीचे उठाव’ या नावाखाली साप्ता. क्रांतीनादमध्ये २६ जाने १९७१ ते २३ मार्च १९७१ पर्यंत लेखमालेच्या स्वरुपात प्रथम मुद्रीत झाले सदर लेखमालेसाठी आक्टो-नोव्हें. १९७० मध्ये महिनाभर नागालॅण्डचा दौरा केला. ही लेखमाला लिहीतांना ‘नागालँड’ ‘नागाज इन नाईंटींथ सेंचूरी’ या डॉ वेरीयर एल्वीन यांच्या ग्रंथाचा ‘मिझो मिरॅकल’ या पुस्तकाचा तसेच अमीत नाग यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या ‘ ट्रायबल मिरर ’ या नियतकालीकाचा संदर्भासाठी बहुमोल उपयोग झाला. !

# .... अखेर हे पुस्तक मी पूर्ण केले !

तसा मी काही दैववादी नाही परतु 'झू–दाओ अन् चर्चबेल्स' हे पुस्तक कधी काळी प्रकाशित होईल याची मी आशाच सोडून दिली होती. या पुस्तकाचा इतिहासच तसा क्लेशदायक त्याचे असे झाले,

हातात वेडावाकडा बोरु धरुन पत्रबहादूरी नुकतीच सुरु केली होती 'माणूस' च्या श्री ग मा नी चान्स दिला आणि नक्षलवादी चळवळीवरील 'रोखलेल्या बदुका, उठलेली जनता' ही लेखमाला चाग-लीच गाजली आंध्रहून परतलो आणि सर्वोदय मडळाचे कार्यकर्ते श्री जयवत मटकर भेटले त्यानी आणि 'क्रांतिनाद' साप्ताहीकाचे सपादक अण्णासाहेब जाधव यांनी 'क्रातिनाद' साठी मला लिहायला सांगितले. तेव्हा मी जेमतेम एकवीशीचा होतो आणि माझी प्रतिज्ञा होती की, ' तिशीच्या आत सपूर्ण हिंदुस्तान पालथा घालायचा. देशाच्या सर्व महत्वाच्या समस्यांवर लिहून काढायचे ' आणि म्हणून मी मटकराना सागून टाकले, – क्रातिनाद' साठी लिहीलेच तर फक्त नागा मिझोवर लिहीन. तुम्ही मला नागालँडला पाठवा

मटकर स्तभितच झाले मग खर्चाचे बजेट काढायला सांगितले बजेट काढले नुसता प्रवासखर्चच अठराशेवर जात होता मटकरानी 'क्रातिनाद सारख्या दोड दोन हजार खपाच्या साप्ताहिकाला हा खर्च परवडणार नाही म्हणून सागितले दुसरा कोणता विषय सूचवा म्हणाले पण मी माझ्या निर्णयावर अढळ होतो. साधारण सशस्त्र क्रांतिकारका विषयी मला प्रेम आणि ओढ होतीच. तसेच नागा–मिझोंवर सविस्तर असे कोणी लिहीले नव्हते. त्यामूळे या विषयावरील लेखमालाही गाजेल नवा अनुभव मिळेल, भरपूर भटकायला मिळेल याची खात्री होती

दोन महिन्यानंतर मटकरांचा निरोप आला भेटायला गेलो तेव्हा मटकरांनी हजार रुपये हातात ठेवले आणि सांगितले, नागालँडला चालू लागा तुम्ही तिकडे पोहोचेपर्यंत मिझोरामला जायचे पैसे पाठवून देता मटकरांनी मोठ्या मुश्किलीने जमवून आणलेले ते पैसे खिशात घालून मी प्रवासाला निघालो

नागालॅन्डला पोहोचलो तेव्हां दिमापूरच्या पुढे जायला मला परवानगी मिळेना जवळ ना ओळखपत्र, ना कुण्या बड्या वृत्तसंस्थेचा अथवा दैनिकाचा प्रतिनिधी, ना बड्या धेंडाची ओळख वयही अगदी पोरसवदा पत्रकार म्हणून कोणी दखलच घेईना पण एकेकाच्या खनपटीला बसलो भाषेची अडचण ओलांडून दोनशे पानांची नोटबुक माहिती आणि टिपणांनी भरुन काढली महिनाभराचा मुक्काम तीन आठवड्यात आटोपून गोहत्तीला परतलो तर मटकरांकडून पैसेच आलें नव्हते मिझोरामला जायला पैसे पाठवा म्हणून तार केली. चार दिवस झाले पण उत्तर नाही तेव्हां अपुऱ्या पैशांनीच परतीचा प्रवास सुरु केला. कलकत्त्याला उतरलो तेव्हा नऊ रुपये फक्त खिशात होते. कलकत्त्याहुन एका 'नक्षलवाद्याकडून' (त्याचे नाव विसरलो आता) पैसे घेऊन नागपूरला आलो नागपूरला दयालकडून (हा ही नक्षलवादी) पैसे घेऊन पुण्याला आलो. पुण्याला आल्यावर संतापाने फणफणत क्रांतिनाद कार्यालयावर गेलो तर मटकर डोक्याला हात लावून बसलेले त्यांनी तारेने पाठवलेले पैसे परत आले होते आणि माझे काही पत्रही मिळाले नव्हते त्यामुळे 'माझे काय झाले' याच चिंतेत मटकर होते मला पाहून 'नागा समस्या' सुटल्याइतका आनंद त्यांना झाला असो,

लेखमाला लिहायला बसलो नी लक्षात आले की, टिपणांची वहीच गहाळ झाली आहे. अंगाला दरदरुन घाम फुटला महिनाभर

शोधाशोध केल्यानंतर वही मिळाली नंतर लेखमाला लिहायला सुरु-वात केली. मला नाव द्यायचे होते, 'झू दाओ अन् चर्चबेल्स' परंतु ते नाव सुचण्याआधी 'उगवतीचे उठाव' हे नाव तात्पुरते बोलता बोलता सांगितले होते. त्याच नावाने जाहिरात आणि ब्लॉक बनवले गेले. नंतर 'ब्लॉक वाया जायला नको' म्हणून लेखमालेला तेच नाव ठेवले गेले.

क्रांतिनादचा साराच खाक्या निराळा अंकात तुफान मुद्रणदोष असत छपाई 'दृष्ट लागल्यासारखीच' असे अंक वेळवर निघत नसत. त्याचे वितरण धड होत नसे चालक आणि संपादक ध्येयवादी पण पैशाची कडकी. त्यामुळे अंकाला उठाव नव्हता लेखमाला ' छापून ' झाली पण ' प्रसिद्ध ' झाली नाही लोकांपर्यंत ती पोहोचलीच नाही तेव्हा गाजली नाही हे सांगायला नकोच माझ्या तरुण आणि उत्साही मनाचा त्यामुळे फार हिरमोड झाला.

पुढे क्रांतिनादने ही लेखमाला पुस्तकरुपाने प्रकाशित करण्यास घेतली दोन फॉर्म चांगल्या मॅपलीथोवर छापले नंतर लक्षात आले की, दोन्ही फॉर्ममध्ये मिळून आठशे चाळीस चुका होत्या. वैतागून मटकरांनी ते फॉर्म रद्दीत देऊन टाकले.

मी मात्र मग इरेला पेटलो जेवढी विघ्ने अधिक तितका मी जास्त इरेला पडतो मी स्वतःच हे पुस्तक छापावयाचे ठरवले पहिला फॉर्म कपोज झाला आणि नक्षलवादी खटल्यात मला अटक झाली साफल्य प्रेसच्या कुलकर्णींनी मी आज सुटेन उद्या सुटेन करीत महि-नाभर वाट पाहिली अखेर दोन महिन्यानी फॉर्म सोडवून टाकला

जेलमधून सुटलो आणि 'रणांगण' पुन्हा सुरु केले विवस्वना प्रकाशन संस्थेची स्थापना केली पण दिड वर्षाच्या अवधित क्रांति-नादचे बरेच अंक गहाळ झाले होते ते जमवून हे पुस्तक हाती घेई-पर्यंत विवस्वनाची दोन पुस्तके प्रकाशितही झाली. पुन्हा हे पुस्तक

हाती घेतले तीन फॉर्म छापून झाले बाईन्डरकडे जाऊन पडले मुख-पृष्ठाचे डिझाईन ब्लॉक तयार झाला, आणि चार जुलैच्या मुबईच्या पावसाने मला चांगलाच फटका बसला छपाई तीन महिने बद राहिली नतर पुन्हा सर्व पुस्तके (एकदर तीन पुस्तके) छापायला घेतली आणि लक्षात आले. आमच्या ' वाटचाला ' आलेल्या त्या ' नग ' बाईन्डरने जुगारापाटी एकदर पाच फॉर्म ( पैकी तीन ह्याच पुस्तकाचे ) रद्दीत विकले पार वैतागून गेलो पण जुगाऱ्यापुढे कोणाचे काय चालणार ? एकंदर पुस्तकाच्या पायी ते न छापताच चार पाच हजाराची माती झाली होती दुसरा कोणी असता तर त्याने या पुस्तकाचे वेडच सोडून दिले असते पण मी 'मी' आहे दुसरा कोणी नाही त्य मुळे पुन्हा कपोज सुरु करण्यास सागितले

– आता मात्र यशवताही इरेला पेटला होता. त्याने घडाक्यात तीन फॉर्म कपोज केले आणि मला न दाखवताच छापूनही टाकले दरम्यान एक पैसा मागितला नाही मग कोठून उधारीवर कागद मिळव, कुणाला पोस्ट डेटेड चेक देत पैसे आण असे करीत करीत आज हे पुस्तक पूर्ण झाले

पुस्तकात मुद्रणदोष बरेच आहेत. असूद्यात शेवटचे लेखाक नसल्याने आठवणीने तुटका फुटका मजकुर लिहिला प्रकरणाना नबर नाहीत. नसूद्यात ढेरभर चूका, उणीवा आहेत असूद्यात पण हे पुस्तक अखेर पूर्ण केले की नाही ?

त्या नागांचाच गुण मला चिकटलाय की काय कुणास ठाऊक, अति चिवटपणें, परिणामांची क्षिती न बाळगता ते लढताहेत तसेच, अगदी तसेच झुजून हे पुस्तक मी पूर्ण केले आहे

राजे हो, या पुस्तकाचे मोल फार मोठे आहे बरे !

फार मोठे आहे !!

६ मार्च ७५ –अनिल बर्वे

पाण्याच्या खळखळाटाने जागा झालो – गाडी तिस्ताचा पूल ओलांडत होती खिडकी उघडली आणि सुखावणाऱ्या वाऱ्याने अंगावर शहारे आणले. टिपूर चांदण्याच्या प्रकाशात चहाचे मळे कुजबुजत होते. झोंबणाऱ्या वाऱ्याला लोकगितांची लय होती. आसाम कामरूप आसाम !

कामदेवाच्या राखेतून आसामचा जन्म झाला अशी हिंदु पुराणात कथा आहे आसामच्या सुंदर आणि संपन्न निसर्गाकडे पाहिले की याची खात्री पटते. हिरवीगार उंचच ऊंच झाडी. छोटे छोटे नदी–नाले; त्यातून डोकावणारे पांढरेशुभ्र दगड. लांब दूर निळ्या डोंगर राशी. उतरणीवर विस्तीर्ण चहाचे मळे, त्यातून काम करणाऱ्या मेखला, चादरी छातींपर्यंत गुंडाळलेल्या आसामी स्त्रिया, सुपारीची झाडे, केळ्याच्या बागा आणि बांबूची वने. उगवतीच्या किरणांनी सारा

धासर्मत सोनेरी रंगात चमकू लागतो. म्हणूनच की काय आहोम राजे आपल्या देशाला ' मगदनचुम खाम ' म्हणजेच सोनेरी बागांचा देश असे म्हणत.

परंतु याच सोनेरी बागेवर आज असंतोषाची टोळधाड पडली आहे माझ्याशी बोलताना प्रजासमाजवादी पक्षाचे गोहत्ती येथील पार्टी सेक्रेटरी बिस्वगोस्वामी म्हणाले– 'ब्रम्हपुत्रेवरचा पूल असो किंवा रिफायनरी असो प्रत्येक प्रश्नाकरिता आसामी लोकांना लढा द्यावा लागतो आसामच्या प्रत्येक उद्योगधंद्यावर बिहारी – बंगाल्यांचाच प्रभाव आहे म्हणून येथील प्रांतियवादी वृत्तीसुद्धा उफाळून शिव–सेनेसारखी येथेही लछीतसेना उभी राहीली आहे. आसाम एक स्वतंत्र राष्ट्र करून भारताशी असलेले संबध तोडून थायलंड – ब्रम्हदेश याच्याशी संबध जोडावेत असा अंडरकरंट येथील जनतेच्या मनात आहे.'

मन व्यथित झाले परंतु हा दुरावा आसामी मनात का निर्माण झाला ? हे शोधण्यासाठी आपल्याला आसामचा पूर्वेतिहास नजरेखाली घातला पाहिजे. आसामचा प्राचिन इतिहास महाभारत आणि पुराणात आपल्याला वाचायला मिळतो. नरकासूर हा ज्ञात असा सर्वात प्राचीन आसामी राजा. नरकासूरने कारतीय व ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात राज्य केले. श्रीकृष्णाने त्याचा वध केला, असे पुराणात लिहीले आहे याच नरकासुराचा पुत्र भगदत्त हा आपल्या प्रचंड गजदळासहीत भारतीय युद्धात कौरवांच्या बाजूने लढत होता. आणि कुरुक्षेत्रावर अर्जुनाने त्याचा वध केला असे व्यासांनी युद्धपर्वात वर्णिले आहे किरातार्जुन युद्ध प्रसिद्धच आहे. हे किरात म्हणजे आसामचे रहिवासी. इसवी सन पूर्व काळातल्या या इतिहासानंतर मात्र मध्य–युगीन 'अंधारात' आसाम व भारताचे संबध अस्पष्ट होत गेले आहेत.

इसवीसनाच्या सातव्या शतकात चिनी प्रवासी यु-एन-त्सगनें लिहीले आहे-'पीतवर्णिय बुटके लोक रहात असलेला हा देश, सुमारे अठराशे मैलाचा असून येथील राजे देवाची पूजा करतात. तरीं पण ते सहिष्णु असून जातीने ब्राम्हण आहेत. या देशाच्या अति दक्षिणेला डोंगराळ प्रदेश असून त्यात रानटी हत्ती रहातात ज्याचा युद्धात वापर केला जातो.' या नतर मात्र तेराव्या शतकापासून एकोणीसाव्या शतकापर्यंत सलग सहाशे वर्षे आसामवर हिंदु आहोम राजवट होती या सहाशे वर्षात चवदा वेळा मोगल व मुसलमानानी आसामवर स्वाऱ्या केल्या परतु आहोमांच्या प्रबळ सेनेने दर वेळेस त्याना पराभूत केले एकोणीसाव्या शतकात अहोमाचा अखेरचा राजा सद्रकांतसिंघा याने ब्रम्हदेश विरुद्धच्या लढाईत इग्रजाची मदत मागितली आणि साम्राज्यवादी इग्रजांच्या कुटील राजनितीने १८२४ च्या यादेबूच्या तहान्वये आसामचा घास घेतला

इग्रज राजवटीने आसाम पुन्हा भारतीय जीवनाजवळ आला. परतु मधल्या सहाशे वर्षांच्या काळात एकछत्री सलग राजवट होती भौगोलिक अलगता याने वेगळेपणाची जाणीव आसामी मनात कायमची निर्माण झाली होती. भारतीय समाजजीवनापासून इतिहासातही आसाम नेहमीच दूर राहिला होता बुद्धीझमच्या लाटेने सारा भारत, चीन व आग्नेय आशिया व्यापून टाकला पण आसामवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही आणि याच ऐतिहासिक परपरेने सकुचित जीवन दृष्टी निर्माण झाल्याने एक कॉलेज विद्यार्थी तावातावाने मला म्हणाला '-तेल आसामध्ये निघते परतु त्याचे कर व फायदे मात्र बिहारमधल्या रिफायनरीला मिळतात हे आसामचे शुद्ध शोषण आहे. आसाम म्हणजे भारताची वसाहत झाली आहे वसाहत !'

त्याच्या बोलण्यात आर्थिक सत्य होते व वेगळेपणाची जाणीवही

होती आसाममध्ये दुसरी रिफायनरी निघावी म्हणून सप्टेंबरमध्ये 'आसाम बंद' करण्यात आला सुमारे दहा लाख लोक आंदोलनामुळे वर्षभरात तुरुगात जाऊन आले. परंतु निगरगट्ट केन्द्रीय सत्ताधाऱ्यांनी मात्र आसामकडे दुर्लक्षच केले. परिणामी भारतद्वेष निर्माण झाला. मी गोहत्तीला असताना सोळा ऑक्टोबरला आसामी तरुणानी बिहारी सायकलवाल्याना मारझोड करण्यास व त्यांच्या सायकल रिक्षा जाळण्यास सुरुवात केल्याने पूर्ण बाजार पेठेत भीतीचे वातावरण पसरलेले होते याला जबाबदार भारतीय नेतृत्वच आहे

आसामच्या प्रश्नाचा अभ्यास कोणाही भारतीय नेत्याने केलेला नाही आसामला देण्यात येणारी वागणूक सवतीच्या पोराला दिल्या-सारखी आहे आसाममधील वेगळेपणाची जाणीव नष्ट होण्यासाठी त्याचे भारताशी सामाजिक, सास्कृतीक सबध निर्माण करावयास पाहिजे होते परतु सरकारने केवळ शासकीय सबधानी आसाम–भारत सबध जोडल्याने आसाम म्हणजे अक्षरश भारताची 'वसाहतच' वाटते.

भारत सरकारसारखीच भारतीय वृत्तपत्रेही आसामबाबत उदासीन असतात. 'दिब्रुगडला पुराचे थैमान' किंवा 'नागा बडखोर व सुरक्षादल' यांच्यात चकमक या व्यतिरिक्त आसामी समाज–जीवनाचे प्रतिबिंब आपल्या वृत्तपत्रातून सापडतच नाही. नागा–मिझोंच्या उठावाचा प्रश्न गेले वीस–बावीस वर्षे सतत चिघळत असताना वृत्तपत्रानी वा भारतीय नेत्यानी त्याच्या समस्याचा अभ्यास सखोल कधीही केला नाही.

आसामकडे जेवढे तेवढेच किंबहुना कांकणभर जास्तच दुर्लक्ष नागांच्याकडे झाले. राममनोहर लोहीया किंवा ना. ग. गोरे याचा

अपवाद वगळता नागांच्या समस्या कोणत्याही भारतीय नेत्याने समजावून घेतली नाही गेली वीस–बावीस वर्षे नागा भूमिगतानी भारतीय सत्ताधाऱ्याशी ज्या शर्थीने लढा दिला तो पाहून त्यांचे विषयी कुतूहल, आदर आणि भीती यांच्या संमिश्र भावना माझ्या मनात निर्माण झाल्या होत्या. नागाचे प्रश्न समजावून घेण्यासाठी त्यांचा इतिहास शोधायचा बराच प्रयत्न केला. परंतु नागाच्या इतिहासाविषयी निश्चित अशी माहिती उपलब्ध झाली नाही. प्राचीन वाङ्मयात आलेले आणि इतिहासकारानी केलेले ओझरते उल्लेख हीच आपली शिबदी

महाभारतात अर्जुनाने नागकन्या उलुपीशी विवाह केल्याचा उल्लेख आहे सुभद्रा ही मणीपूर देशाची होती. अशीही माहिती महाभारतात सापडते. इसवीसनाच्या तिसऱ्या शतकात ग्रीक तत्वज्ञ टॉलेमीच्या लिखाणात नागलोकात रहात असलेल्या नागांची माहिती आली आहे अगदी अलीकडे म्हणजे १६३२ मध्ये मोगल इतिहासकार साहीब उद्दीन तलीशने नागाचे 'नानगा' या नावानें बरेच वर्णन केलेले आहे तो लिहीतो–' त्यांच्या कानाना मोठी भोके असतात व ते डुकराची कातडी पांघरनात " अहोम राजापैकी काहींनी नागकन्यांशी विवाह केले होते. परतु असे अपवादात्मक तुरळक संबध सोडल्यास नागांचा भारतीय जीवनाशी व संस्कृतीशी फारसा कधी संबंधच आला नाही डोंगराळ भागात एक संकुचित जीवन शेकडो वर्षे जगत आले आणि त्यातून त्याच्यात " टोळीवाल्याचा संकुचित दृष्टीकोण " निर्माण झाला. त्याचा हा दृष्टीकोनही आजच्या गुतागुतीच्या समस्येस बराच कारणीभूत आहे परतु यास केवळ नागटोळीवालेच जबाबदार नसून–हिंदू समाजाची पलायनवादी वृत्ति, ब्रिटीश साम्राज्यवाद्याचे फोडा झोडा राजकारण आणि आजचे अज्ञ व आडमुठे असे भारत सरकारचे धोरणच बहुताशी कारणीभूत आहे

रेल्वेलाईनच्या कडेला असलेल्या पुरुष पुरुष ऊंच गवतातून मिटरगेज धावपट्टीवरून गाडी घरंगळू लागली छोट्या छोट्या टेकाडातून झाडाझुडपांवर पसरलेल्या रानवेली जंगलाचे गूढ सौंदर्य फुलवत होत्या. धनसिरी स्टेशन आले स्टेशनजवळ वृद्ध वृक्षाखाली एक लाल कपड्यातला तापसी ईश्वराचे ध्यान करीत होता. सकाळची उन्हे धुळीबरोबर लोळण घेत होती एखाद्या जंगल कथेतल्या वातावरणात शिरल्यासारखे वाटू लागले. कोणीतरी पुटपुटले, 'इथून पुढे नागालॅन्ड !'

दिमापुर ! एकेकाळची काचाराची ही राजधानी आता रेल्वेस्टेशन होऊन सैनिकांची ने–आण करीत आहे हे छोटेसे शहर सरकारी माणसांनी सदैव गजबजलेले असते. छोट्याशा नागालॅण्डमध्ये एवढे एक शहरच तेवढे पठारावर आहे. आसामने दिलेली देणगीच जणु. नंतर मात्र पुढे फक्त डोंगरकडे, जंगले आणि अपरंपार आभाळ !

आसपासच्या खाचरातून करकोचे अभक्ष्य भक्षण करीत होते. नागालॅण्ड ! निसर्गपुत्र नागाची ही वैभवशाली भूमी निसर्गाच्या कुशीत विसावली आहे आसामच्या उत्तर–पूर्वेला भारत–ब्रम्हदेश सीमेवर पूर्वेकडील तिराप नदीपासून दक्षिणेला मणीपूरपर्यंत व पश्चिमेला धनगिरीपासून रेंगमा टेकड्यापर्यंतच्या मुलखात नागा टोळीवाले 'झु-दाओ' संस्कृतीत रहात या पूर्वकडच्या भागात पाटकोइपासून उत्तर ब्रम्हदेशातल्या हुकवेंगच्या पश्चिम खोऱ्यापर्यंतचा प्रदेश दऱ्याखोऱ्यांनी व डोंगरांनी व्यापला असून सर्वत्र शंभर इंचावर पाऊस पडतो समुद्रसपाटीपासून पाच ते नऊ हजार फूट ऊंचीवरच्या या इलाख्यात चार लाख नागा टोळीवाले राहतात. सात हजार चौरसमैलाच्या या प्रदेशात लागवडीखाली येण्याजोगी साडेसात लाख

एकर जमीन जेमतेम कसली जाते. उद्योगधंदे नाहीत असे म्हणणेच वास्तवतेला धरून होईल. अशा प्राथमिक अर्थव्यवस्थेमुळे सपन्न जगले व जमिनी असूनही या राज्याचे वार्षिक उत्पन्न केवळ पाच लाख असून, शासनाचा खर्च मात्र चार कोटी रुपये आहे

दिमापुरच्या बाजाराला चक्कर टाकली. ब्रम्हपुत्रा ओलांडून आलेल्या दूर देशीच्या पायस्थांना सारे नागा एकच भासतात. परंतु शरीर बांधा, भाषा, चालीरीती यात नागाच्या टोळ्याटोळ्यांत फरक आहे. एका टोळीची भाषा दुसऱ्या टोळीला समजत नाही. केवळ भारतातच नागांच्या पस्तीस टोळ्या असून अगामी, आओ, चाकेसग, काबुईकाचा, कोन्याक, लोथा, माओ, मराम, रेंगमा, सेमा, तग, खुल, सिमचुगर या प्रमुख टोळ्या आहेत तर ब्रम्हदेशात हैती, हुतगन, त्याच्या आदि मोठ्या टोळ्या आहेत.

या साऱ्या टोळ्या गेली हजार दोन हजार वर्षापासून इथे राह-तात. परतु नागाचे मूळ वसतीस्थान कोणते हे मात्र न उलगडले गेलेले कोडे आहे नागावर मगोलियन वशप्रभाव जरी जास्त आढळत असला तरी मानववश शास्त्रज्ञाच्या मते नागा एकाच 'कॉमनस्टॉक' मधले नाहीत त्यांच्यातल्या काही टोळ्यांचे इडोचीन-मलाया-इंडोनेशिया तैवान आणि फिलीपाइन्स मधील प्राथमिक मनुष्याशी साधर्म्य आहे. इडोनेशियातील हेडहटरपासून दक्षिण समुद्रातल्या व सयाममधल्या विविध मानववशाचे ठसे नागावर उमटलेले आहेत. सुप्रसिद्ध मानव-वश शास्त्रज्ञ डॉ. जे एच् हटन यांचा असा कयास आहे की-

"खोइराओ टोळीवाले पश्चिमेकडून आसामच्या पठारावरून आलेले आहेत. सेमाज हे दक्षिणेकडून आलेले असावेत तर अगारी, कोईराओ हे पश्चिमेतील गारोज भोइस, लीगमय, काचारी याचेपैकी

असून कालयो कोंगू हे उत्तरेतील असावेत. संगताम हे दक्षिण पूर्वेतील चिंदवीन खोऱ्यातून आलेले, तर अगामी हे मिश्रवशीय परंतु तगखुल या दक्षिण विभागातून आलेले आहेत.

नागामधले हे वांशिक वैविध्य त्यांच्या जीवनामध्येसुद्धा आढळते नार्थ ईस्टर्न ग्रुपमधल्या नागा टोळीवाल्याची भाषा बोडो किंवा कुकी टोळीवाले याच्याशी मिळती जुळती आहे. मध्य भागातल्या नागाची भाषा मात्र त्यापेक्षा वेगळी आहे दोन टोळ्यातले नागा आपापसात नेहमीच इग्रजी किंवा आसामी भाषेत बोलतात

" भारतातील इतर आदिवासी आणि टोळीवाल्यांपेक्षा नागाचे जीवन सस्कृतीने आणि वैविध्याने अधिक सपन्न नि स्वतत्र आहे" आसामातील नामवत साहित्यिक श्री. विरेन्द्रकुमार भट्टाचार्य यानी मला सांगितले होते भट्टाचार्यजी नागालँडमध्ये दोन वर्षे शिक्षक म्हणून राहिलेले होते त्यानी नागा जीवनावर लिहिलेल्या कादबरीस साहित्य अकादमी पारितोषिक मिळालेले आहे, समाजवादी विचार सरणीच्या या साहित्यिकाने नागा समस्या शांततेने सुटावी म्हणून पहिल्यापासून प्रयत्न केले होते प्रमुख नागा नेत्याबरोबर त्याच्या कित्येक बैठकीही झाल्या होत्या, परतु नागामधील अतिरेकी गटाच्या दबावाने त्यांच्या प्रयत्नात यश आले नाही. भट्टाचार्यांचा असा आरोप आहे की, भारतीय नेत्यांचे नागाच्या जीवनाबद्दलचे अज्ञान व त्यांच्या प्रश्नाविषयी अनास्था हाच शांततेच्या प्रयत्नातला मोठा अडसर आहे. काळे असले तरी हे सत्य आहे नागा मिझोमध्ये वेगळेपणाची जाणीव का निर्माण झाली? याची कारण मिमासा न करता व योग्य उपाय योजना न करता भारतीय सत्ताधाऱ्यानी केवळ लष्करी बळावर नागालँड ताब्यात घेऊन स्वत चे साम्राज्यवादी स्वरुप स्पष्ट केले आहे.

नागा नेत्यांचा मुख्य दावा असा आहे की, 'आम्ही कधीच भारतीय नव्हतो वा भारतीय संस्कृतीशी निगडीत नव्हतो भारती–यांनी आमच्यावर कधीही राज्य केले नव्हते ब्रिटिशांनी एकोणी–साव्या शतकात लष्करी बळावर नागालँड भारताला जोडला त्या आधी आम्ही स्वतंत्र होतो आणि म्हणूनच आजही आम्हाला स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र हवे आहे ' नागा नेत्यांचा हा दावा ऐतिहासिक सत्यावर आधारलेला आहे हे मान्य करावयास पाहिजे

नागा भूमिगतांची समस्या समजावून घेण्यासाठी मी कोहि–माच्या मिसेस सोएझांना भेटायचे ठरवले मिसेस सोएझा ह्या फिझोच्या भाची असून त्या नागा नेत्यांशी चांगल्याच संबंधीत आहेत कोहिमा येथे डॉ आराम हे सर्वोदयी कार्यकर्ते असून ते शांतता समितीचे सदस्य आहेत. परंतु कोहिमाला यायला दिमापूर येथील सबडिव्हिजनल ऑफिसरची परवानगी घ्यावी लागते (घटनेत मात्र संचार स्वातंत्र्य आहे.) ब्रिटिश कायद्याप्रमाणे 'इनरलाईन परमिट' असल्याशिवाय टोळीवाल्यांच्या प्रदेशात पठारवाल्यांना प्रवेश मिळत नाही हा कायदा विविध कारणे पुढे करून भारत सरकारनेही चालू ठेवला आहे हा कायदा भारतीय व नागा यांच्यात दुरावा निर्माण करतो म्हणून तो रद्द करावा अशी मागणी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी केली होती व त्या कायद्याचे निषेधार्थ बावन्न साली सीमा भंगही केला होता. परंतु हा कायदा अजूनही लागू आहे. रविवार असल्याने एस् डी. ओ ऑफिसही बंद होते. रात्र आता जांभया देत होती मी सर्किट हाऊसवर परतलो.

हिंदू जातीयवादी नेहमीच असा प्रचार करीत असतात, की नागा हे हिंदु होते व मिशनऱ्यांनी त्यांना बाटवल्यामुळे त्यांच्यात वेगळेपण निर्माण झाले. परंतु मला तरी या आरोपात गलिच्छ व

हिणकस जातीयवादी विचारा व्यतिरिक्त काही आढळले नाही. ख्रिश्चन धर्म स्विकारण्यापुर्वी नागा हिंदु नव्हते व हिंदू धर्म विचार प्रणालीशी त्याचा काहीही सबध नव्हता तितके ते सुसस्कृतही नव्हते गेल्या शतकापर्यंत नागा हे मनुष्यभक्षक होते अजूनही टूएनसग विभागात 'हेड हटिंग' चालू आहे अशा हिंस्त्र, जगली व मानवी सस्कृतीच्या प्रथमावस्थेतील नागाच्या धर्म कल्पनाही ढोबळ-अस्पष्ट व दतकथा युक्त अशाच होत्या

काचार नागांमध्ये चार देवांची पूजा होत असे. सिब्राइ हा देवाचा राजा माउशिनी हा पिकाचा व जगलाचा राजा त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी पाढऱ्या फाऊल पाखरांचा बळी नागा देत. सोनधु ही ग्रामदेवता तिला प्रसन्न करून घेण्यासाठी अडी न टाकणाऱ्या छोटया फाऊल पाखराचा बळी नागा देत. आणि 'गजा' हा युद्धाचा देव त्याला प्रसन्न करून घेण्यास तांबडया कोंबडयाचा बळी देत. धार्मिक विधि व मत्रतत्र जवळपास नव्हतेच. नागामध्ये अत्यविधीही पुरूनच केला जाई थोडक्यात नागांचा धर्म हा प्राथमिक अवस्थेतील टाळीवाल्यांचा धर्म होता. त्यांचा प्रगतीवर आणि विकास पावलेल्या हिन्दु कल्पनेशी काहीही सबध नव्हता

नागा टोळीवाले हे 'आदिम साम्यवादी' जीवन पद्धतीत जगत होते ते शेती करत परतु मुख्यत' ते मांसाहारीच होते. यांची ग्रामरचना व जीवनपद्धतीही लढाऊ टोळीवाल्याचीच होती. एकत्रित सामुहिक जीवन जगणारे नागा माकड, माजर, कुत्रे, साप आदि प्राणी खात. त्याच्या जेवणात भाताबरोबरच तादुळापासून बनवलला 'झू नावाची द'रू फार मोठया प्रमाणावर प्याली जाई, प्रत्येक उत्सवामध्ये नागा लोक आपली पारपारीक नृत्ये आपल्या रगीबेरगी पोषाखात करतात नागा नृत्य ही विलोभनीय व नेत्र दिपक असतात. म्हणूनच

प्रजासत्ताकदिनाचे दिवशी नागा नृत्य ही प्रेक्षकाच्याही कुतुहलाचा विषय ठरतात.

आज पारंपारिक नागा योद्धे फक्त तरुण मुलांच्या युद्ध नृत्यातच पहायला मिळतात कारण आजचे मिझोनागा आधुनिक शस्त्रांनी सज्ज आहेत परंतु अजूनही शिकारीसाठी पारंपारिक शस्त्राचाच उपयोग केला जातो. नागा वेगवान व सरळ दिशेत दोनशे यार्डापर्यंत अचूक नेमबाज करण्यात प्रसिद्ध होते पानाच्या आकाराची पातळ लोखंडी टोके असलेले त्यांचे बाण मागून पेटवलेले व कित्येकदा विषाने माख–लेले असत बळकट धनुष्यबाणाप्रमाणेंच स्वत'च्याच उंचीचे शेळीच्या केसांनी व झुबकेदार गोंडानी सजवलेले त्याचे भाले, आखूड पण टोकदार पात्यांचे असत. नागा कुठेंही जावो त्याच्या बरोबर सदैव भाला हा असेच हातात भ ला असल्याशिवाय नागाचे चित्र जणू पूर्ण होत नाही नागाजवळ ब्रम्ही मेकच्या तलवारी गेल्या शतकात आढळू लागल्या तरीपण सर्वसाधारण नागा तलवारीऐवजी 'दाओ' नावाचे कोयत्यासारखे हत्यार वापरीत, 'दाओ' विविध आकाराचे असत व त्याचे उपयोगही विविधरित्या करीत कमरेवर चमकदार हाडानी सजलेल्या लाकडी म्यानात दाओ ठेवला जाई. अजूनही कोणत्याही खेडूत नागाजवळ 'दाओ' असतोच लढाईत वापरायची शिरस्त्राण नागा वेताची करीत ही वेताची शिरस्त्राणें वजनाला हलकी, परंतु भक्कम असावयाची शिरस्त्राणे आतून सांबराच्या केसानी मढवित. क्वचित तऱ्हेतऱ्हेच्या पिसांनी सजवलेलाही असत हे नागा युद्धावर निघालें की जणू रूद्रच शूळ घेऊन अवतरला असे वाटे

दिमापूर–कोहिमा येथे वावरणाऱ्या टाइटपँट घालणाऱ्या आणि सुशिक्षीत नागांना पाहून हे कधी मॅनइटर (माणसे खाणारे) किंवा हेडहंटर (डोकी उडवणारे) होते असे वाटायचेहि नाही. गेल्या अर्ध

शतकात या सर्व घटनानी पुरातन दतकथेत स्वरूप घेतले आहे. परतु अजूनही नेफामधील 'अबोर' जमातीमध्ये काही टोळचा मनुष्यभक्षक आहेत तर टुएनसग येथे अधूनमधून हेडहटीग होते, लावणीच्या वेळी पिकाना चैतन्य यावे म्हणून मानवी बळी दिले जात त्याच्याकडे एकही मानव डोके नाही तो पुरुष समजला जात नसे. टोळयाटोळ्यातल्या लढाईत मृतांची डोकी कापून ठेवली जात. ज्यांच्याकडे जास्त डोकी तो वीर गणला जाई व मृत्युनंतर त्याच्या थडग्यावर त्याने जम वलेल्या मानवी डोक्याचा आकडा कोरला जाई. इतकी हिंसता असलेले हे नागा एवढे सुसस्कृत केव्हा झाले ? त्याच्यामध्ये एवढी राजकीय प्रगल्भता–राष्ट्रीय जाणीव कशी निर्माण झाली ? मी सभ्रमात पडलो आणि हळूहळू अधार मला घेरू लागला.

रात्रीच्या स्वप्नात अतचक्षूनी नागांच्या जीवनाचे सारे रग ओळखले काचारांच्या राजधानीत-जळणाऱ्या शेकोटी भोवती मुडमाळा घातलेले नागा, भोपळे आणि पोखरलेल्या खोडांच्या वाद्यांचे तालावर नाचत होते. गात होते. आणि हळूहळू डोंगर कपारीतला अधार घुसमळून निघू लागला. कुठेतरी उजाडत होते

जागा झालो. लाबवर मद उदास घटानाद ऐकू येत होता चर्च-ऑर्गनवर पापक्षालनासाठी उदात्त,प्रार्थना म्हटल्या जात होत्या चर्चचे शिखर आभाळाला ठेंगणे करीत होते. मानवी विकासाची ही साधी गोष्ट–

दूरदेशीच्या पाथस्थांना सारे नागा एकच भासतात परतु तिथेही डझनावारी टोळचा एक अदीम साम्यवादी जीवन कुठे तरी डोंगर कपारीत फटफटू लागले. चर्चबेल्स् वाजू लागल्या होत्या !

आडगावात गर्दीचे ठिकाण म्हणजे मनोरजनाचे एकमेव

साधन दिमापूरला मात्र रेल्वे स्टेशनची गर्दी मला सहन झाली नाही. सर्वत्र—सैनिक आणि फक्त सैनिक, नोकरशाहीचा उर्मटपणा, जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांच्या झडत्या सर्वत्र दबलेले, असंतुष्ट पण उदास वातावरण, उगाचच युद्धकालीन बाल्कन राष्ट्रात आल्यासारखें वाटत होते.

दिमापूरच्या बाजारपेठेंत सारे व्यापारी बंगाली, बिहारी किंवा मारवाडी, नागा मात्र फुटकळ किरकोळ विक्रेते म्हणून गुजराण करतात साहजिकच या मोठ्या व्यापाऱ्यांविरुद्ध नागाच्या मनात चीड आणि द्वेष आहे. हे व्यापारींसुद्धा पोलिसाच्या जोरावर शिरजोरी करीत असतात

तालुक्याच्या गावी एवढ्याशा शहरात उल्लेखनीय अशा दोनच वस्तू एक काचाराच्या जुना किल्ल्याची भूतकाळात गुरफटलेली पडकी कमान आणि नागालॅण्ड स्टेट ट्रान्सपोर्टची इमारत. नागालँण्ड स्टेट-ट्रान्सपोर्टच्या निळ्या गाड्या लक्झरी बसेसप्रमाणे वाटत होत्या. अर्थात हा वैभवाचा भास फक्त कोहिमा ते दिमापूरपर्यंतच पुढे कुठेंच रस्ते नाहीत.

एका 'दाक्षिणात्याच्या' खानावळीत चार घास चिवडले महागडे नी निकृष्ट प्रतीचे अन्न ही आणखीन एक बोचरी आठवण. तांदुळांचे प्रमुख उत्पादन असलेल्या या जिल्हावजा राज्यात तांदूळ मात्र आयात करावा लागतो. दिमापूरचा तांदूळ दोन अडीच रुपये किलो भावाने मिळतो प्राथमिक अर्थव्यवस्थेंत शेतीची झालेली हेळसांड आणि पाच लाख एकर पडीक जमीन ही महागाईची जन्मदात्री आणि सरकार मात्र या त्राटिकेकडे दुर्लक्ष करून 'थातुरमातुर' सुधारणा घडवून प्रगतीचा डंका वडवीत असते.

अल्पसंख्य टोळीवाल्या नागांना भारतीयांच्या नैसर्गिक वर्चस्वाची जशी भीती वाटते तशीच अधिक शोषणाचीही वाटते. जर नागा व्यापार उद्योगात समर्थ नी स्वयपूर्ण झाले तर भारताविषयीच्या त्यांच्या दुराव्याच्या भावनेचा बराच निचरा होईल. याची कल्पना काही ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांना आली होती

"गेली. आठ वर्षे या विभागाचे अधिकार माझकडे आहेत माझ्या कारकीर्दीत अगामी नागा प्रदेशात मी तीन लष्करी मोहिमा काढल्या आणि माझ्या प्रत्येक मोहिमेकरता सरकारने माझे अभिनंदनच केले. या मोहिमेतील जमा अनुभवावरून भविष्यकाळात नागा टोळीवाल्याशी ठेवण्याचे संबंधाबाबत माझे मत असे झाले आहे की—

"टोळीवाल्यांच्या अंतर्गत कारभारात आपण हस्तक्षेप करू नये, व त्याकरिता लष्करी मोहिमाही काढू नयेत. गेल्या बारा वर्षांत आपण ज्या दहा मोहिमा काढल्या त्यांची फलनिष्पत्ती आपणास दिसतच आहे. मी माझ्या या आधीच्या सोळा जानेवारी अठराशे सेहेचाळीसचे पत्रात म्हटले होते की, आपण दिमापूरलाच राहून टोळीवाल्यांना डाओज, कुदळी आदी शेतकी हत्यारे, शेतीविषयक माहिती देणारी पत्रके आणि मीठ आदि गरजेच्या वस्तु पुरवाव्यात, परंतु माझ्या मताकडे दुर्लक्ष करण्यात आले मी त्याचबरोबर हेही नमूद केले होते की नागांना युद्धशास्त्राचे ज्ञान देऊ नये व त्यांना आधुनिक शस्त्रास्त्राचा पुरवठाही करू नये उद्या हीच शस्त्रे नागा आपल्याविरुध्द वापरण्यास कमी करणार नाहीत. तेव्हा व्यापाऱ्यांना नागा टोळीवाल्यांना शस्त्रे व दारुगोळा पुरविण्यास त्वरित बंदी करावी आणि अजूनही सरकारने दिमापूर येथे व्यापारी केन्द्र उघडून नागांना कापड व हस्तिदंत याचा व्यापार करण्यास प्रोत्साहन देऊन आपण युध्दोत्सुक नाही हे पटवून द्यावे."

वरील पत्र अठराशे बावन्नमध्ये लेफ्ट व्हिन्सेटने गव्हर्नर जनरलचे एजटास पाठविले होते. या पत्राचा उल्लेख जे एच हटन् याच्या "नागा इन् नाईन्टीन सेन्चरी" या पुस्तकात आहे त्या पत्राचे महत्व तेव्हां इतकेच आजही आहे त्या पत्रात लेफ्ट व्हिन्सेंटने पुढे म्हटले होते–

'अंगामी नागा तसे भयकर नाहीत. ते युध्दखोर असले तरी इतर जिल्ह्यात अगर प्रदेशात ते प्रवेश करीत नाहीत. त्यांचे हल्ले केवळ गुलाम व आवश्यक गरजांच्या वस्तूसाठी असतात. त्यांना जसेजसे व्यापाराचे महत्व व फायदे समजतील तसतसे त्याचे हल्ले कमी होतील त्यांना परवापर्यंत पैशाचा उपयोग माहीत नव्हता. परतु आता त्यांच्यातील कित्येकजण हुशार व्यापारी असल्याचे माझ्या नजरेस आले आहे. त्यांच्यापैकी काहीं जण थेट कलकत्त्यापासून माल खरेदी करीत आहेत. तेव्हा त्यांना व्यापारास, उद्योगधंद्यास उत्तेजन देऊन सुसस्कृत करता येईल पण लष्करी दडपशाही केवळ अशक्य !"

व्हिन्सेंट सारख्या लष्करीं अधिकाऱ्यांना जे सत्य शंभर वर्षांपूर्वी उमगले ते भारतीय सत्ताधाऱ्यांना व त्याच्या तथाकथित लोक–प्रतिनिधीना अजूनही समजू नये हे 'अज्ञान की ढोंग' ब्रिटीश साम्राज्य वाद्यानी नागाच्या अतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न सोडून दिला. परतु त्याना व्यापार किंवा तत्सम उद्योगधद्यांना प्रोत्साहन किंवा मदत दिली नाही आणि सदैव या लढाऊ टोळयांना भारतीय समाजजीवनापासून दूर ठेवले याबाबत लॉर्ड डलहौसीने म्हटले होते–

" . नागा प्रदेश सदैव ताब्यात टेवणे अशक्य व अव्यवहार्य आहे त्यांना आपल्या वर्चस्वाची एक नैसर्गिक भीती वाटते. तेव्हां त्याच्यावर अप्रत्यक्षपणें वर्चस्व ठेवावे, नागा बंडखोराना मणीपूरचा राजा मदत करतो तेव्हां त्यास तबीं देण्यात यावी"

लॉर्ड डलहौसीच्या विधानावरून हे स्पष्ट होइल नागा प्रदेशात राज्य करणें आर्थिकदृष्टया अशक्य असल्याने व ब्रिटीश हे व्यापारी बच्चे असल्याने त्याना नागावर राज्य करावयाचे नव्हते. हेच धोरण त्यानी अफगाण लढाऊ टोळीवाल्यांबाबत अंगिकारले होते मग अशा स्थितींत ब्रिटीशांनी नागा प्रदेशात का हस्तक्षेप केला? कारण आसाम ताब्यात घेतल्यानंतर आसाम व मणिपूर याच्यात थेट दळणवळण ठेवणे आवश्यक झाले परतु मध्ये सर्वत्र नागा प्रदेश पसरलेला होता आणि अधुनमधून लुटालूट करण्यासाठी नागांचे ब्रिटीश राज्यावर सतत धुरटे हल्ले चालू होते तेव्हा या नागांचा बदोबस्त करणें आवश्यक होऊन बसले.

० ० ०

अठराशे बत्तीसचे जानेवारीमध्ये ब्रिटीशांनी नागा प्रदेशात पहिली लष्करी मोहीम काढली, या मोहीमेचे नेतृत्व कॅप्टन जेंनकिन्स व पेंबर्टन यांच्याकडे होते, या मोहीमेत आठशे सैनिक व सातशे कुली सहभागीं झाले होते. आठशे सैनिकांच्या तुकडीसाठी सातशे कुली होते यावरूनच दुर्गम अशा नागाप्रदेशात लष्करी वर्चस्व बसवणे किती कर्मकठीण आहे याची स्पष्ट कल्पना येऊ शकेल. ब्रिटीश सैन्याने मणिपूर नागा प्रदेशात सेंगमाए-म्युग-स्वाग-मुरम-खूडू-मोहिलांग-यांग-पपुलोमाई-तिलमाहू-धनसरी-मोहागदेसाह व राम-हू या मार्गाने नागा प्रदेशात घुसलेल्या फिरंग्याना अगामी नागांनी प्रखर व कडवा विरोध केला. ब्रिटीशांच्या बंदुका व दारूगोळयांना आगीचे बाण समजून, आपल्या ढालींना ओल्या केळीचे खुंट बसवून नागांनी प्रतिकार केला परंतु ब्रिटीशांच्या आधुनिक शस्त्रांनी व कवायतींनी

सज्ज अशा सैन्यापुढे नागाना माघार घ्यावी लागली, अठराशे एकोण-चाळीसला सब. असि कमिशनर ग्रेजने नागा प्रदेशावरील लष्करी मोहीमेचे नेतृत्व केले. नागाव जिल्हा व मणिपूर यांच्यातील हद्दी ठरविण्यासाठी लेफ्ट. बिग्गे अठराशे चाळीसमध्ये नागालँडमधे शिरला इतक्या मोहिमा काढूनही नागा प्रदेशाचा नकाशा ब्रिटीशांजवळ नव्हता. तेव्हा अठराशे सेहेचाळीसमध्ये कॅप्टन बटलेरने नागाप्रदेशात नविन लष्करी मोहीम काढली. या मोहीमेत थॉर्टनने नागा प्रदेशाचा पहिला नकाशा तयार केला अशाप्रकारे बारा वर्षात दहा लष्करी मोहीमा ब्रिटीशानी काढल्या

प्रत्यक्ष लढाईत नागांचा पराभव होऊन त्याना माघार घ्यावी लागली तरी सुद्धा घनदाट जगले, डोंगराळप्रदेश, रस्ते जवळ जवळ नाहीतच, प्रतिकूल हवामान यामुळे ब्रिटीश आपला सार्वत्रिक अमल नागा प्रदेशावर बसवू शकले नाहीत आजही भारत सरकारपुढे याच समस्या उभ्या आहेत ब्रिटीशांच्या या अपयशाने नागा व ब्रिटीश सैन्य याच्या सतत चकमकी झडू लागल्या व नागांना दहशत बसावी म्हणून ब्रिटीश अधिकाऱ्यानी नागांची खेडीच्या खेडी जाळून पोळून उध्वस्त करण्यास जबर सामुदायिक दंड बसविण्यास सुरवात केली ब्रिटीशा-च्या या दडपशाही अत्याचारी धोरणामुळे अठराशे एकोणऐंशीमध्ये नागा प्रदेशात सशस्त्र बडाचा वणवा पेटला. नागा टोळीवाल्यानी एकत्र येऊन ब्रिटीश डिस्ट्रिक्ट कमिशनरसह पस्तीस अधिकाऱ्याना कापून काढले आणि कोहीमावर हल्ला चढविला. नागांचे बड मोड-ण्यासाठी मणिपूरहुन ब्रिटीश फौज पाठविण्यात येऊन कोहिमा भोव-तीचा वेढा मोडून काढण्यात आला. आणि नागा सशस्त्र बडाचा बीमोड करण्यात आला या बडानंतर मात्र ब्रिटिशांनी नागाबाबत अत्यंत सौम्य धोरण स्वीकारले. त्याचबरोबर नागाप्रदेशात मिश-नऱ्यांचा प्रवेश झाला. आणि लवकरच नागा प्रदेशांत शांतता

युगायुगाच्या अंधकारानंतर ब्रिटीश साम्राज्यवाद्यांचे आक्रमण आणि मिशनऱ्यांचा प्रवेश यानें नागा टोळीवाल्याचा बाह्य जगाशी संबंध आला अठराशे एकोणएंशीच्या बंडानंतर सुमारे चाळीस वर्षे भीषण स्मशान शांततेत नागा प्रदेश अखंड बुडून गेला होता या शांततेचा शेवट जागतिक युद्धानी धडविला विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात घडलेल्या दोन्ही जागतिक युद्धानी नागा जीवन पुन्हा एकदा ढवळून निघाले दोन्ही युद्धात सर्व बाजूची सैन्ये नागा प्रदेश ओलांडून गेली. बर्मा रोडला अनन्यसाधारण लष्करी महत्व प्राप्त झाले शेकडो नागा ब्रिटीश सैन्यात दाखल करून घेण्यात आले हजारो नागा कुली म्हणून परदेशात पाठवले गेले. आपला मुलुख ओलांडून बाहेर आलेल्या नागांनी जे काही पाहिले तें डोळे दिपवणारे होते, भव्य होते न्यूनगंड निर्माण करणारे होते नागांच्या न्यूनगंडाने लवकरच ट्रायबल फॅसिझमचे विकृत स्वरुप धारण केले.

नागा जमातीमध्ये जो 'ट्रायबल फॅसिझम' निर्माण झाला, त्याची जबाबदारी हिंदुत्ववाद्यांवरच आहे ब्रिटीशांनी आपल्या प्रदेशात राज्यकारभारासाठी 'जे नेटिव्ह स्वामीनिष्ठ' नेमले ते आपल्या उद्दट आणि क्रूर वागणुकीने जगभर बदनाम झाले नागालॅण्ड सोडाच आफ्रिकेत जो भारतद्वेष निर्माण झाला त्याला हे नेटिव्ह स्वामिनिष्ठच कारणीभूत आहेत या नेटिव्ह अफसराचे अत्याचार कमी पडले म्हणूनच की काय व्यापारी त्याच्या दिमतीस गेले. लोटा घेऊन परदेश गमन करणारा मारवाडी नोटा घेऊन परतू लागला यातच तो किती 'शोषणपटु' होता हे स्पष्ट होते. आज आफ्रिकेतूनही भारतीय व्यापाऱ्याची उचलबांगडी होत आहे आणि नागांनाही भारतीय व्यापाऱ्याचे वर्चस्व सहन होत नाही

मी दिमापुरला असतानाच एकवीस ऑक्टोबरला दुकानदार जास्त भाव घेतो म्हणून नागा विद्यार्थ्यांनी त्याचे दुकान लुटले आणि एकच दंगल उडाली. सर्व बाजारपेठ बंद पडली. सुरक्षादलाचे सैनिक मारझोड करून शांतता पसरवू लागले. जर हे सैनिक आधीपासून काळाबाजार व नफेबाजी याबाबत जागृत राहिले असते तर ही दंगल उडालीच नसती परंतु भारतीय व्यापारी व अधिकारी हे एकत्र येऊन नागांवर 'सार्वभौम सत्ता' गाजवीत भूतकाळाचे पलिते पेटवत असतात.

असाच एक प्रसंग सोळा ऑक्टोबरला घडला. एका सिंधी हॉटेलवाल्याचे व नागांचे चांगलेच भांडण जुंपले, कारण आम्लेटचे पैसे त्याने 'मुर्गीच्या' भावात घेतले हे दररोजचे गाऱ्हाणे होऊन बसले आहे.

पहिल्या महायुद्धानंतर अनेक नागा परदेशात जाऊन उद्योगधंदे करू लागले होते सुशिक्षित नागांनी नागालँडमध्ये १९१३ साली कोहिमा व मोकाकचुंग येथ 'नागा क्लब' ही नागांची पहिलीच व एकमेव राजकीय सामाजिक व सांस्कृतिक संघटना. बेचाळीस साली जे स्थान काँग्रेसला भारतीयांच्यात होते तितकेच किंबहुना त्याहून जास्त व्यापक व परिणामकारक स्थान 'नागा क्लब'ला मिळाले

नागा नॅशनल क्लब' ने आपल्या दुःस्थितीला भारतीयांना जबाबदार धरले ते सत्यही होते मिशनऱ्यांनी नागांना रोमन लिपी दिली इंग्रजी बोली दिली–धर्म दिला, शिक्षण दिले आणि मुळातच दूर असलेले नागा भारतीय जीवनापासून आणखीन दूर [illegible]ले नागांना जंगली आदिवासी समजणाऱ्या भारतीयांनी लक्षात घेतले पाहिजे. की हेतू काहीही असो–मिशनऱ्यांनी नागांना माणसात

आणले.'

आज जरी ऐंशी टक्के नागा ख्रिचन असले तरी एकोणीसशे एक साली मात्र केवळ पाचशे नागाच ख्रिचन झालेले होते मिशनऱ्यांनी अहर्निश परिश्रम, चिकाटी व सेवाभाव यातून नागांमध्ये हा कायाकल्प घडविला मिशनऱ्यांचे नागा प्रदेशाकडे अठराशे चौऱ्याहत्तरमध्ये लक्ष वेधले आणि वैद्यकीय मदत घेऊन मिशनरी नागा प्रदेशात आलें सुरवातीस ब्रिटीशांचे हस्तक समजून कित्येक मिशनऱ्यांना नागांनी कंठस्थान घातले. परंतु मिशनऱ्यांच्या सेवाभावाने लौकरच नागांचा राग थंडावला आणि अठराशे चौऱ्याण्णवमध्यें मोलुगयेमचेन येथे प्रथम चर्चबेल्स निनादू लागल्या

हें चर्च अमेरिकेत बॅप्टीस्ट मिशनरी रेव्ह क्लर्क याने बांधले. आज नागा प्रदेशात सहाशेपेक्षा अधिक चर्च असून लाखावर त्याचे सभासद आहेत प्रत्येक चर्चमध्ये पास्टर असून नागा आपल्या ग्रामकोशातून दरमहा त्यास पन्नास रुपये देतात मिशनऱ्यांच्या या कार्याने त्यांच्याबद्दल आपुलकी व प्रेमभाव निर्माण झाला. याचमुळे भूमिगत नागाचे मनोगत कळावे. त्यांच्याशी सबंध प्रस्थापित करता यावेत व त्यानी शांततेचा मार्ग स्विकारावा याकरिता भारत सरकारला मिशन व चर्च पुढारी याचे सहाय्य घ्यावे लागले

चर्चपुढारी हे प्रथमपासून नागांचे हितसंबंधाबाबत जास्त जागरूक राहिल्याने त्यांच्यावर भारतातील जातीयवाद्यांनी कुटिरतेचे आरोप केले. परंतु चर्चने कधीही नागांना सशस्त्र उठावास चिथावणी दिली नाही किंवा शस्त्रपुरवठा केला नाहीं.

नागा भूमिगतांना वाटाघाटीचे टेबलावर आणण्यात तसेच

त्याच्यात लिबरल नेतृत्व तयार करण्यात चर्चच्या पुढाऱ्यांनी महत्त्व पूर्ण कामगिरी बजावली, तरीही चर्चपुढारी हकनाक बदनाम झाले. चर्चपुढारी बदनाम होण्यास नागामधील अतिरेकी गट, मायकेल स्कॉटची धरसोडवृत्ती आणि जातीय विद्वेषाने परिपूर्ण असा वृत्तपत्रीय प्रचार कारणीभूत झाला या सर्व गोष्टी लक्षात घेऊनही चर्चने व मिशनऱ्यांनी जी संस्कृती व प्रगत जीवन नागांना देऊ केले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणीच राहिले पाहिजे

कोहिमाच्या रस्त्याला गावाच्या कडेला एस. डी. ओ. ऑफिस आहे नागा संस्कृति-नागा संस्कृति जी काही म्हणतात ती तिथे दिसली. तांबड्या चादरी पांघरलेले, कानात मोठमोठी कडी घातलेले व लांब शडचाच नागा टक्कास चित्रपटातल्या रेड इंडियनाशी सादृश्य भासतात. नागांच्या चादरी अत्यंत सुंदर व हातमागावर विणलेल्या असतात. अर्थात महागही तेवढ्याच ! काळ्या पट्ट्यांच्या खांद्या-वरून 'ग्रीक शिलेदारा सारख्या' पांघरलेल्या चादरींची किंमत सत्तर ते ऐंशी रुपये असते. नागाचे 'डाओज' सुद्धा पन्नास रुपयांच्या पुढेच असतात.

नागा मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली असून ते पाश्चात्यांचे अंधा-नुकरण करतात. अशी खोटी समजूत आपण करुन घेतली आहे परंतु 'फॅसिझमचा जंतू' जो स्वत्वाचा अहभाव. हा नागांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आहे आपल्या जमातीची पारंपारिक नृत्ये, उत्सव, परंपरा याबाबत इतर भारतीयांपेक्षा नागा जास्त जागरूक असतात. मिशन-ऱ्यांनी नागा जीवनातील धर्माची पोकळी तेवढी भरुन काढली परंतु या 'नव्या धर्माने' त्यांच्या जीवनात काही अडथळे निर्माण केले नाहीत, किंबहुना, यामुळेच तो रुजू शकला

न्यूनगंडातून निर्माण होणारा 'फॅसिझम' हा अहंभावातून पोसला जातो हे तर्कविसंगत खरे; परंतु व्यावहारिक सत्य आहे. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे—वर्गीय समाजाचे राजकारण इथे खोटे पडते कारण बिचाऱ्या नागामध्ये 'वर्गच' नव्हते. आज मात्र भांडवल—भांडवली मनोवृत्तीने नागामध्ये चांगलाच प्रवेश केला आहे. आजचे जे 'नागालॅंड' चे राजकारण चालते ते 'वर्गीय स्वार्थाच्या' दृष्टिकोनातून चालते. कदाचित त्यामुळेच भूमिगत नागाना उठावाचा 'बेस' कच्चा आहे हे उमगले असावे आता नागा भूमिगत—नेते व नक्षलवादी क्रांतिकारक एकत्र येऊ पहात आहेत.

ठराविक नमुन्यातील अर्ज एस्. डी. ओ. च्या कार्यालयात देऊन परतलो. वेळ कसा काढायचा हा मोठा प्रश्नच होता. सिनेमाला गेलो

दिमापुरात दोन थेटर्स आहेत या थिएटरातून धूम्रपान करता येते अंगात मस्ती असेल तर चांगली जागा पटकावता येते. कमी जास्त होणाऱ्या गर्दीप्रमाणे खुर्च्या कमी जास्त करता येतात. स्थितप्रज्ञ असाल तर बाजूच्या 'साठमारीत' लक्ष न घालता एकाग्रचित्तेने सिनेमा पाहता येतो. जर दरवाज्याच्या कडेला बसला असलात तर मध्यंतरात बाहेरही जाता येते. अत्यंत टीपटाप व्यवस्थित असाल तर कदाचित खुर्ची किंवा बाक जे काही दैवात असेल त्याला अडकून तुमचे कपडे फाटणारसुद्धा नाहीत थोडक्यात 'श्रींची इच्छा असेल तर तुम्ही सिनेमाही पाहाल—

तिकीटाच्या खिडकीशी हातघाईची झुंपली होती . . सांगायचे राहून गेले. . 'भारतीय सैनिकांना' नागालॅण्डमध्ये 'खास सवलती' दरात सिनेमे पहायला मिळतात

त्या निस्तब्ध खोलीत किरीच्या संतापाशिवाय इतर कशाचे अस्तित्व जाणवत नव्हते किरी, एक सुशिक्षीत नागा तरुण. राहणारा कोहीमाचा वडीलांचे फार्मसीचे दुकान एकंदरीत सुखवस्तु त्याची माझी ओळख गोहती दिमापुर प्रवासात सेकंडक्लासच्या डब्यात झाली

' सेकंडक्लासचा डबा ' हे फक्त विशेषनाम. कारण गोहत्तीच्या पुढे सारा माणसे अक्षरशः मालगाडीतच कोंबलेली असतात रजा संपवून परतणारी लष्कराची माणसे दिब्रूगडच्या गाडीवर 'टोळधाडी' सारखी तुटून पडतात लष्करातल्या माणसाची मस्ती नि उर्मटपणा स्थानिक लोकांना सहन होत नाही त्यात जुन्या खपल्या निघतात शीख फलटणीने केलेले अत्याचार नागा टोळीवाल्यांना आठवतात. आणि मग संतापाने त्यांच्या अंगाची लाही उडते

किरी त्याच्या घराचे फोटो दाखवत होता. बहिण, भाऊ, वडील अन शेतवाड्या. कुटुंबसंस्था केवळ उत्पादन साधनाच्या मालकीतून निर्माण झाली की माणसाच्या संस्कृतिविकासातून ? मोठा प्रश्नच आहे ते काहीही असो परंतु नागा जरी कुटुंब व्यवस्थेत रहात असला तरी त्यांचे संपूर्ण ' सोशलायझेशन ' झालेले असते. स्वतःच्या टोळीशी तो पूर्ण समरस झालेला असतो कदाचित हा ' मोरुंग ' मधल्या सह-जीवनाचा परीणाम असेल

ख्रिश्चन धर्म प्रसाराआधी तरुण मुलामुलींना आईवडिलाजवळ राहणे नागा अनैतिक समजत. मुलगा सात वर्षाचा झाला की त्याची रवानगी ' मोरुंग ' मध्ये केली जाई. प्रत्येक गावात एक मोठे गवताने शाकारलेले सामुहिक घर असे त्या घरात सर्व मुले रहात. ' मोरुंग ' मध्येच मुलगा टोळीचे रितिरिवाज, लढण्याचे व उदरभरणाचे शिक्षण

घेई. एकदा मुलगा 'मोरुग' मध्ये गेला की तो लग्न होऊनच बाहेर पडे. मुलाकरता जसे 'मोरुम' असे तसेच मुलींकरता 'हीळोकी' नावाची सामुदायिक घरे असायची. या घरामुळे नागा मूळ टोळीच्या जीवनाशी सपूर्ण एकरूप होत 'व्यक्तिवादासारखी' मध्यमवर्गीय फॅडे त्याच्यात निर्माण होत नसत प्रत्येकजण टोळीचा–टोळी प्रत्येकाची अ । साधेसुधे सरळ सूत्र.

नागा मुलांना सामूहिक जीवनाची ओढ व टोळीविषयीच्या प्रेमाचे हे जे बाळकडू मिळाले त्यामुळे त्याना इतर 'भाडवलदारी' सुखे मोहवू शकली नाहीत. नागा विद्यार्थ्यांना भारत सरकारने फार चांगल्या शिष्यवृत्त्या व नोकऱ्यांची प्रलोभने दाखवली होती. परतु कलकत्त्यामध्ये सुखासीन जीवनात राहिलेला नागा तरुण ग्रॅज्युएट होताच नागालॅण्डमध्ये परतू लागला शिकत असलेले नागा तरुण, भूमिगत नेते व परकीय वकिलाती यांच्यामधल्या दुभाष्याचे काम करू लागला. सुशिक्षित नागा तरुण ही बडखोरांची फार मोठी शक्ती होती.

'आभाळ दाटून आल आणि वारा सोसाटू लागला कुठेतरी वीज कडाडली' हे सर्व साहित्यिक वर्णन झाले नागांच्या लोककथे–प्रमाणे मात्र. .

विश्वाचा सचार करायला देव वाऱ्यावर निघाला आहे देवच तो–'मोटारीत थोडाच मावणार ?' जाता जाता तो झाडाच्या फांद्या तोडून खाली टाकत होता. कारण त्याने पाढऱ्या मुग्याना वर दिलाय ना ? फार फार पूर्वी सान्या पाढऱ्या मुग्या देवाकडे गेल्या त्यांनी तक्रार केली 'देवा ! आम्हाला मोठी झाडे खाता येत नाहीत तेव्हा आम्हाला खाण्यासाठी लहान लहान फांद्या खाली टाकत जा.' देवाने

म्हटले 'तथास्तु !' आणि तेव्हापासून देव आकाशातून संचार करताना लहान लहान फाद्या टाकू लागला. वीज चमकली हो ! वरच्या भावाने शस्त्र पसरले म्हणजे त्याचे काय झाले फार फार पूर्वी पृथ्वीवरच दोन देवभावात भांडण झाले तेव्हा थोरल्या देवभावाने धाकट्या देवभावाला अंधारात लोटून स्वर्गात प्रयाण केले अधूनमधून धाकटा देवभाऊ वरच्या देवभावाला आवाज देतो तेव्हा त्याच्या प्रत्युत्तरासाठी मोठा देवभाऊ शस्त्र परजतो त्याच विजा

'या फार फार पूर्वीपासून' प्रचलित असलेल्या लोककथा मला फार आवडतात, समृद्ध लोककथा वाङ्मय म्हणजे संपन्न जीवनसंस्कृतीचे लक्षण. लोक कथा म्हणजे माणसाच्या सृष्टीवरच्या प्रेमाचे निदर्शन.

पावसाची रिपरिप चालूच होती फिकट पिवळ्या उजेडात 'ट्रायबल मिरर' मध्ये भूतकाळ न्याहाळत होतो 'ट्रायबल मिरर' हे त्रैमासिक अमितनाग नावाचा तरुण पत्रकार शिलाँग येथून प्रसिद्ध करीत असतो. 'ट्रायबल मिररची' गेल्या तीन वर्षातली सारी फाईल मी चाळली. केवळ तपशील प्रश्न सोडवू शकत नाही. निरोगी व स्वच्छ दृष्टिकोनाचीच तेवढी आवश्यकता असते. परंतु आम्ही भारतीय स्वतःच्याच स्वार्थी ठोकळेबाज सूत्रांनी नागा समस्या सोडवू पाहतो तोच दोष मला 'ट्रायबल मिरर' मध्ये देखील आढळून आला. राष्ट्रवादाच्या राजकीय कल्पनेला आम्ही समाजजीवनापेक्षा अधिक महत्त्व देऊ लागलो तर संघर्ष अटळच ठरणार. नागासमस्या सोडवताना अखंड भारत राष्ट्राची कल्पना आम्हाला थोडीशी बाजूलाच ठेवायला हवी नागांना स्वतंत्र परंतु आपल्याशी संलग्न अशी तडजोडीची शासन यंत्रणा द्यायची आपण तयारी ठेवली पाहिजे परंतु भारत सरकारने इतपत उदार धोरण कधीच स्वीकारले नाही झाडून

सारे नागा स्वतंत्र राष्ट्र मागत असताना केवळ लष्करी जोरावर नागालॅण्ड ताब्यात ठेवून आपण द्वेषभावना मात्र वाढवतो.

गेल्या २०–२२ वर्षांत दर वर्षाला चार कोटींची तूट आणि जो लष्करावर अफाट खर्च झाला तोच तडजोडीची शासनयंत्रणा देऊन भरपूर आर्थिक मदत देऊन नागांशी स्नेहसंबंध वाढवता आले असते. आणि नागानाही सर्वथैव दृष्ट्या भारताशी नागालँडच्या भौगोलिक स्थानामुळे मैत्रीच ठेवावी लागली असती. तरुण नागा नेता झेड रोमिओ हा बिरेंद्रकुमार भट्टाचार्यजींना म्हणाला होता की भूतान–सारखा राजकीय दर्जा देऊन नागा समस्या सोडवावी. परंतु सर्व मागण्या फेटाळून द्वेषाशिवाय भारत सरकारने काहीही मिळविले नाही.

सहजच मिल्टनची उक्ती आठवते 'जेथे द्वेषाची जखम खोल-वर आहे तेथे तह अशक्य होय!'

दिमापूरच्या 'प्रेमिला' पुस्तकालयामध्ये मला नागालॅण्ड सर-कारची काही प्रकाशने पहायला मिळाली. नागालँड मधले काही स्थानिक पेपरही चाळायला मिळाले आणि नागालॅण्डकडे झालेल्य दुर्लक्षाची कल्पना आली.

दिमापूर येथे रोजी बाराशे टन गाळण शक्ती असलेला साखर कारखाना काढण्याची सूचना आसाम इंजिनिअरिंग डिव्हिजनने केली होती आणि अडीच कोटींचा प्लॅन देखील तयार केला होता. हा जो कारखाना 'चौथ्या पंचवार्षिक योजने'च्या पोटात गेलाय तो अजून काही बाहेर निघत नाही. रोजी साठ टन शक्तीचा खांडसरी कार–खाना देखील 'केवळ विचारधीन' आहे. टू एन त्सग विभागात मॉन

येथे सूत गिरणी काढण्याची एक योजना गेली कैक वर्षे आकार घेत आहे. मोकाकचुंग येथे कागदाचा कारखाना काढण्याची एका फ्रेंच कपनीने पधरा कोटीची योजना आखली आहे र.ज्यात लाकडावर आधारलेल्या उद्योगधद्याना फार मोठा वाव आहे. म्हणजे फक्त वावच तेवढा आहे.

जर नागालॅण्डमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास घडवून आणला असता व तज्ज्ञ आणि सहाय्यक म्हणून भारतातील सिव्हिलियन्स नागालॅण्डमध्ये गेले असते तर नागांचा राग निवळून ते आपल्याशी एकरूप झाले असते परतु केवळ लष्कर आणि व्यापारी एवढीच भूमिका नागालँडमधील भारतीयाची असल्याने परस्परसबध दुरावतच आहेत

नागालँड स्टेटच्या स्थापनेनतर राज्य सरकारने इडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना केली असून मोठ्या उद्योगधंद्यासाठी 'कच्चामालाच्या' पुरवठ्यासाठी गुदामे उभारण्याचे काम सुरु केले आहे.

रेशमाच्या उद्योगधद्याची विकास योजना तयार करण्यात येत असून राज्यातील उद्योगाना स्वस्त वीज मिळावी म्हणून राज्य वीज मडळाने नद्या–ओढ्याचा सर्व्हे चालविला आहे.

नागालँड स्टेटच्या स्थापनेनतर हळूहळू विरोध थंडावत आहे. जर आताच आर्थिक विकास व सामाजिक न्याय याचेकडे सरकारने लक्ष पुरवले व नागामध्ये लिबरल नेतृत्वाचे हात बळकट केले तर अजूनही नागा समस्या शांततेने सोडविता येईल.

कोहिमा रेडीओवरून शांतता आणि राष्ट्रवादाचे पोवाडे सतत

प्रक्षेपित करण्यात येत असतात. परतु गरीब नागांकडे रेडीओ आणि ट्रँझिस्टर या दुर्मिळ चिजा आहेत. ते खोक्यातल्या केंद्रसरकारी आवाजापेक्षा नागा फेडरल गव्हर्नमेंटच्या अधिकृत प्रवक्त्यावरच जास्त विश्वास ठेवतात.

नागा फेडरल गव्हर्नमेंट आणि फिझो आदी नेते यांच्याच पाठीमागे बहुसख्य नागा जनता असल्याने, शासनयंत्रणेमधले निवडून दिलेले अधिकारी या पलीकडे नागा राज्य सरकारच्या मंत्र्याना नागा जीवनात स्थान नाही

अगामी झापू फिझो ! एक लोक विलक्षण शोकात चरित्र.

आयंन चेहेरेपट्टीच्या या प्रखर लढाऊ वृत्तीच्या नागा नेत्याच जन्म खोनोमा या गावी या शतकाचे सुरवातीस झाला. कोहिमातल्या मिशनरी शाळेत जेमतेम सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतल्यावर तो ब्रम्हदेशात कुठे अमेरिकन बायबल विक, कुठे मेडिसीन एजट म्हणून गुजारा करी. तर कधी 'सनलाईफ इन्शुरन्स कपनीच्या' कॅनडातील कपनीचा एजट म्हणून गुजराण करीत वयाची चाळीशी गाठली चार मुली व तीन मुलाचा हा कुटुबवत्सल गृहस्थ एकाएकी नागाचा नेता म्हणून प्रसिद्धीस आला

जपान्यांनी ब्रम्हदेश काबीज केला व तेथूनच फीझोच्या जीवनात आमूलाग्र क्राती झाली बेचाळीस साली जपान्यानी ब्रम्हदेश काबीज केला तेव्हां फीझोचा आझाद हिंदसेना कार्यकर्त्यांशी सबध आला व बेचाळीससाली तो आझाद हिंदसेनेशी सामिल झाला त्याच्या व्यक्तिमत्वावर आणि राजकीय हालचालींवर नेताजी व कायदे आझम जिनाचा फार मोठा प्रभाव पडला आहे. जीना व सुभाषचद्राची एकत्रीत व छोटी प्रतिमा म्हणजेच झेड फीझो.

पचेचाळीस साली आझादहिंद सेनेच्या पराभवानंतर ब्रिटीशांनी बर्माचा ताबा घेतला व फिझोची रवानगी रगून तुरुंगात झाली. तुरुंगातून सुटला व नागालॅन्ड कौन्सिलचा सदस्य व लवकरच अध्यक्ष झाला. आज नागामध्ये तो ' कायदे आझम ' म्हणून प्रसिद्ध आहे

फिझोचा असा दावा आहे की, ' सुभाषचंद्रांनी त्याला स्वतंत्र नागालँडचे वचन दिले होते.' त्याच्या दाव्यात सत्यही असण्याची फार मोठी शक्यता आहे, कारण दुसऱ्या युद्धात सारी नागा जमात ब्रिटी-शांशी एकनिष्ठ असताना फीझो एकटाच आझाद हिंद सेनेंत सामिल झाला होता.

अतिशय धाडसी-संघटना कुशल-बुद्धीमान परतु हेकेखोर एकांगी व हुकुमशाही प्रवृत्तीच्या नागा नेत्याने ' नागा फेडरल गव्हर्नमेंटची ' स्थापना करून सशस्त्र लढयाचा मार्ग स्वीकारला. नागांना एक संघटित जमातीच्या स्वरूपात जगासमोर आणले.

गव्हर्नर हैदरीबरोबर झालेल्या नऊ कलमी योजनेस धुडकावून फिझोच्या नेतृत्वाखाली १९५५ सालापासून नागांनी सशस्त्र बंडाचा भडका उडवला. परतु नेताजींना मिळाली त्याप्रमाणें फिझोस परकीय देशांची मदत फारशी मिळाली नाहीं व भारतीय सैन्यापुढे त्यांचा अंशतः पराभव झाला. या पराभवामुळे त्याच्या नेतृत्वास उतरती कळा लागली. त्याचबरोबर नागांमध्ये दुफळी निर्माण होऊन सौम्य मवाळ तडजोडवादी नेतृत्व निर्माण झाले. अखेर १९५७ मध्ये एक लाख रुपये घेऊन तो ब्रिटनच्या आश्रयाला गेला. ब्रिटनमध्ये राहून त्याने नागा समस्या आंतर-राष्ट्रीय चव्हाट्यावर मांडण्याचा प्रयत्न केला, त्यातही त्याला अपयश आले.

सप्टें. ७० मध्ये फीझो भारतीय सरहद्दी जवळील एका देशात म्हणजेच बहुतांशी पुर्वपाकिस्तानमध्ये चीनच्या दुय्यम नेत्याची भेट घेण्यासाठी आला होता परतु चिनी नेत्यांनी त्यास निश्चित मदतीचे आश्वासन दिले नाही. त्याचप्रमाणे प्रथम श्रेणीच्या नेत्यांशी चर्चा करावयासही संधी दिली नाही. चिनी नेते अजून 'नागालॅण्ड' हा भारतातच प्रदेश दाखवतात कारण नागांच्या विचारसरणीवर व शक्तिवर त्याचा विश्वास बसत नाही. सप्टें. ला फीझो व चीनी नेते यांची बोलणी चालू असताना नागाभूमिगतानी प्रखर हल्ले चढवले. याम गे केवळ शक्ती प्रदर्शनाचाच हेतू होता. परंतु नागांचा हेतु सफल झाला नाही.

चिनी नेते नागांच्या उठावास क्रांतिकारी व श्रमिक जनतेची मुक्ती चळवळ म्हणून वळण देऊ इच्छितात परतु धर्म व टोळी-वाल्याचा सकुचित दृष्टीकोन असलेले नागा आपले उद्दीष्ट एवढे व्यापक करू इच्छित नाहीत. यामागे आणखी एक कारण असावे.

भारतातील सारे आदिवासी किंवा टोळीवाले हे भाडवलदारी किंवा सरजामदारी व्यवस्थेच्या यत्रणेत जगल्याने व त्याचा शोषक वर्गाशी कायम सबध आल्याने त्यांना वर्गीय जागृति व राजकीय दृष्टीकोन मिळतो याउलट नागांचा कधीच भाडवलदारी, सरजाम-दारीशी सबध आला नाही. नागांची खेडीही लोकशाही पद्धतीचा कारभार करीत त्यांच्यामध्ये सरजामशाही राजा इत्यादी गोष्टींना स्थान नव्हते अर्थात त्यामुळेच त्यांना समाजवादाचे फारसे आकर्षण वाटत नाही.

त्याचा शोषक वर्गाशी अगदी अलीकडे सबध आला. पण साव-कार, व्यापारी याकडे जो 'भारतीय' याच नजरेने पाही. आज मात्र

हे वर्गभेद खुद्द नागामध्ये निर्माण झाल्याने त्याना ' वर्गीय राजकारण ' समजू लागले आहे आणि याचीच परीणीती नागा व नक्षलवादी यांच्य एकत्रित आघाडीमध्यें होण्याची शक्यता आहे.

आज फीझो आपल्या मुलीसह लंडनला निराश मनोवस्थेत शेवटचे दिवस कठीत आहे. मायकेल स्कॉटने आमसभेपुढे नागा समस्या माडण्याचा केलेला प्रयत्नही असफल झाला आहे. ' नागालँड ' पासुन फार दूर असल्याने येथील राजकारणावरचे त्याचे वर्चस्व आणि पकड निसटून चालली आहे पैशाचा पुरवठा व आश्रय दिला गेल्यामुळें तो मिशनरी पुढाऱ्याचा मिंधा झाला आहें. त्यातच तरुण नागा चुकीचे राजकारण बदलून स्वतःच्या लढयास क्रांतिकारी वळण देऊ पहात आहेत काहीं दिवसांनी फिझोचे संबधही नागालँडच्या राजकारणाशी संपतील कारण त्याचें जुने सहकारी सपत चालले आहेत. पुढील इतिहासात राजकारणातील लोकोत्तर व्यक्ति या पलीकडें फारसे त्याचे स्थान असणार नाही.

पूर्वी सुभाषबाबूच्या पराभवाने आणि आता फिझोच्या अपयश ने एक गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे केवळ राजकीय कल्पनांच्या आधारावर जनता चळवळीं टिकू शकत नाहीत जनआंदोलनास प्रत्यक्ष भौतिक कारणाची व योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

० ० ०

हिंदू जातीयवादी पुढारी श्री गोळवलकर गुरुजी यानी नुकतेच असे विधान केले की, ' नागा हे हिंदू होते व अजूनही त्यांच्या वर त्यांच्या राणीचा प्रभाव आहे ' भिंतीवरचे नकाशे फडफडले म्हणजे भूकंप होत नाहीत. स्वतःच्या जातीयवादी राजकारणासाठी सत्याचा विपर्यास केल्याने सत्य बदलत नाही,

मी या आधीच स्पष्ट केले आहे, की नागा हे कधीही हिंदू नव्हते आज ज्या 'तथाकथित' राणीचा गोळवलकर उदो उदो करीत आहेत ती राणीही हिंदू नसून तिने स्वतःचा ' हरका हरकामे ' नावाचा एक जंगली धर्म स्थापन केला आहे नागामध्यें राजेशाही नव्हती ही राणी वगैरे काही नसून स्वतःस राणी म्हणून तिने घोषित केले आहे

राणी ! राणी गौडुलीउ ही सत्तर वर्षांची वृद्ध स्त्री मणीपूर

स्टेटमध्ये राहते, तिचा नवरा 'जगदो नागने' जो काचा नागांचा टोळी प्रमुख होता त्याने १९३० च्या सुमारास स्वत:स राजा म्हणून घोषित करून ब्रिटीशांविरुद्ध सशस्त्र बंड केले. ब्रिटीशांनी त्याचा बिमोड करुन त्यास अटकेत टाकल्यावर 'गौडुलीडने' स्वत:स 'राणी' म्हणून घोषित केले तेव्हां ३२ साली ब्रिटीशांनी तिलाही कैदेत टाकले १९४७ ला स्वातंत्र्यानंतर तिची सुटका करण्यात आली. सध्या मणीपूर स्टेट तिला 'स्वातंत्र्ययोद्धी' म्हणून दरमहा २०० रुपये मानधन देत आहे.

स्वत. राणी आपल्या मूठभर अनुयायासहीत मणीपूर येथे रहाते तिच्या तथाकथित धर्माचा वा पुढारीपणाचा नागावर काहीही पगडा बसलेला नांही तिने स्वत:स भारत सरकारची मित्र म्हणून घोषीत केले असल्याने इथले ' जातीयवादी ' निश्चितच तिचा उदोउदो करणार परतु ६५ मध्ये तिच्या अनुयायांनी नऊ भूमिगत नागा बंड-खोरांना ठार मारण्यापलिकडे काहीही वीरकृत्ये केलेली नाहीत तिच्या अनुयायांची संख्याही जेमतेम हजार भरेल. थोडक्यात नागालॅण्डच्या समाजजीवनावर तिचे काहीही वर्चस्व नाही.

" पत्रकारांना गृहखात्याच्या पूर्व परवानगी शिवाय आत सोडत येत नाही " एस्. डी. ओ. ने खुलासा केला अशा वेळी संताप, उद्वेग व्यर्थ असतो. लाल फितीत पन्नास कोटींना बांधण्याची शक्ती आहे, मी नागालॅण्डच्या मुख्यमन्त्र्याना मि. होकीशेंसे यांना फोनवरून भेटण्याचा प्रयत्न केला परतु महाशय दौऱ्यावर गेले होते. एक प्रयत्न म्हणून दिमापूर येथील ' ताजेन आओ ' या नागा आमदारास भेटावयास गेलो परतु ते कोहीमाला गेले होते. थोडक्यात गृहखात्याची रितसर परवानगी येईपर्यंत स्वस्थ बसणे भाग होते.

दिमापूरातीलच नागरिकाना भेटणे, त्याच्याशीं बोलणे भाग होते

भाषेची अडचण ही फार मोठी होती. कारण सर्वांना इंग्रजी यायचे नाही जे यायचे ते टीपीकल नागा इंग्लीश असावयाचे. हिंदी विषयी द्वेष भावना पुरती जडलेली आणि असामी चहा धड नीट गंध नाही

आसामात केवळ ५७ टक्के लोक आसामी बोलतात डोंगरी राज्ये अस्तित्वात यायला हेही—एक मोठे कारण आहे आसामी बोलणाऱ्यांची संख्या अल्प असल्याने भाषाभिमान आसामचे अभगत्व राखू शकला नाही. टोळ्या विविध आणि त्याच्या भाषाहि वेगवेगळ्या असल्याने भाषावर प्रांतरचना करायची म्हटल्यास आसामात डझन—दीड डझन राज्य निर्माण होतील आसाम म्हणजे विविध वंश, भाषा यांची एक खिचडीच आहे.

सायमन कमिशन येऊन गेले नागा क्लबच्या निवेदनाकडे दुर्लक्ष करण्यात आले स्वातंत्र्याआधी लॉर्ड कुपलेनने ब्रिटिशापुढे एक योजना मांडली त्याप्रमाणे भारत-ब्रम्हदेश सीमेवरील टोळीवाल्यांचा मुलूख तोडून त्यास 'क्राऊन कॉलनी' चा दर्जा देऊन तो ब्रिटिश अमला-खाली ठेवावा अशी कल्पना होती, परंतु आर्थिकदृष्टया तोटयाची ही योजना मरत चाललेल्या ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना परवडण्यासारखी नव्हती—अर्थातच ही वसाहतवादी कल्पना बाजूला पडली.

स्वातंत्र्यपूर्व काळात व आजही नागालॅण्डमध्ये अखिल भारतीय स्तरावरील एकही पक्ष नसल्याने नागा समस्या दुर्लक्षीत झाली व याच परिस्थितीत भारत स्वतंत्र्य (?) झाला. स्वातंत्र्यानंतर पूर्व-पाकिस्तानांतून निर्वासितांचे लोंढे यायला सुरवात झाली हे सारे निर्वासित मोठे 'पापभीरू' होते अशातला भाग नाही स्वतःच्या वर्तणुकीने स्थानिक लोकात प्रिय होऊन हाकलले गेलेले होते. आपण आजही सिंध्याच्या उर्मटपणा, फसवणुकीच्या वृत्तीला संतापतो. हे

सिंधीही निर्वासित म्हणूनच आले आहेत. पूर्व पाकिस्तानातून आलेल्या या निर्वासितांनी नागा–मिझो टोळीवाल्यांच्या प्रदेशात प्रवेश केला. मिळालेल्या सरकारी सवलतींचा फायदा, स्वतःची हुषारी व नागाचे अज्ञान याच्या सहाय्याने त्यानी इथेही चागलाच जमीन जुमला बन-वला व नागाच्या भारतीयाविषयीच्या द्वेषात भर घातली

स्वातंत्र्य मिळताच ' नागा नॅशनल कौन्सिलने ' स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली सरकारने प्रश्न बिकट असल्याचे ओळखले आणि सुर-वातीच्या काळात दोन्ही बाजूनी शांततामय व तडजोडीची भूमिका स्वीकारली. ' नागा नॅशनल कौन्सिल ' व आसामचे गव्हर्नर सर हुंदरी ह्यांच्यात ४७ साली नऊ कलमी तडजोड झाली त्याप्रमाणे–

नागाना स्वत ची उन्नती करून घेण्यासाठी व विकास साधण्या साठीं त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना स्वातंत्र्य राहील. या करता नऊ कलमीं योजना दोहोबाजूनीं अमलात येईल

न्याय–सर्व प्रकारच्या दिवाणी व फौजदारी खटल्यात जे नागा मध्ये व नागाहीन विभागात तंटे उद्भवतील त्याचा निवाडा नागा रीति रीवाजाप्रमाणे करतील परंतु महत्वाच्या व मृत्यु असलेल्या खटल्या बाबत गव्हर्नरकडे अर्ज करता येईल

जर नागा व इतर ह्याच्यात १ कोहिमा आणि मोकाकचूंग येथे २ किंवा शेजारील पठारी प्रदेशात–जिल्ह्यात तंटा उद्भवल्यास जिल्हा न्यायधीश नागा नसेल तर त्याच्या मदतीस नागा न्यायधीश देण्यात येईल

शासन–सर्वसामान्य तत्व मान्य करण्यात आले आहे की ज्याना ' नागा नॅशनल कौन्सिल ' पगार देईल. त्याचेवर तिची हुकमत

राहील. हेच तत्व झालेल्या कामाना व कर्मचाऱ्यांना जबाबदार राहील जिल्हाधिकारी हा गव्हर्नरच्या सल्ल्याने नेमण्यात येईल. सबडिव्हीजनल कौन्सिलच्या बरोबर फुलटाईम, एक्झीक्युटिव्ह प्रेसिडेंट असेल, त्याना 'नागा नॅशनल कौन्सिल' पगार देईल हे दोघे जिल्हाधिकाऱ्यास त्याच्या कामाबाबत व एन एन. सी ला तिच्या कामाबाबत जबाबदार राहतील. शेतकरी खाते, शिक्षण खाते, पी. डब्ल्यू डी व वनविभागातील सर्वाधिकारी एन एन सी. असेल. ह्या सर्वांना एन. एन सी पगार देईल.

विधानसभा –सदर नऊ कलमी योजनेला बाधा आणणारा कोणताही कायदा राज्य किंवा केन्द्रीय सभागृह बनविणार नाही. नागासंबधी कोणताही कायदा एन. एन सी च्या सल्ल्याशिवाय करण्यात येणार नाही जर एखादा कायदा वरील योजनेला बाधा आणत असेल तर तो नागा हिलडिव्हीजनला लागू करण्यात येणार नाही.

जमीन–'नागा नॅशनल कौन्सिलच्या' परवानगीशिवाय नागा हिल्समध्ये कोणीही बिगर नागा जमीनखरेदी करू शकणार नाही.

कर–सर्व तऱ्हेचे कर बसविणे जमा करणे व खर्च करण्याची जबाबदारी एन एन. सी. वर राहील.

हद्दी–नागा जिल्ह्यातील जगले जी शिवसागर व नोगाव जिल्ह्यात आहेत ती सर्व नागाहिल जिल्ह्यात आणण्यात येतील व कोणताही भाग एन एन. सी. च्या परवानगीशिवाय दुसऱ्या जिल्ह्यात टाकण्यात येणार नाही

शस्त्र कायदा – एन एन. सी च्या सल्ल्याप्रमाणें जिल्हाधिकारीं शस्त्र कायद्याच्या तरतुदी वेळोवेळी अमलात आणेल

करार काल–'गव्हर्नर ऑफ आसाम' हा भारतीय संघराज्याचा

एजट असल्याने त्याचेवर हीं तडजोड १० वर्षे राखण्याची जबाबदारी आहे. १० वर्षानंतर हा करार पुढे चालू ठेवायचा किंवा नवा करावयाचे हे ठरविण्यात येईल.

कायदे – 'द चिलहिल्स रेग्युलेशन' आणि 'बेंगल ईस्टर्न रेग्यु-लेशन' हे चालू राहतील

वस्तुत त्या शांततापूर्ण करारानंतर भारत सरकारने त्वरीत पावले उचलून असंतोषाची कारणें दूर करावयास पाहीजे होती परंतु ती दूर करताच ५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा झाली ह्या सार्वत्रिक निवडणूकीवर फिझोच्या नेतृत्वाखाली एन एन सी ने बहीष्कार टाकला परीणाम एकही उमेदवार उभा राहीला नाही व एकही मत पडले नाही. इतका प्रखर अहिंसक निषेध गांधीवाद्यांनी सुद्धा कधी व्यक्त केला नव्हता.

५३ साली एन एन सी. ने 'पीसफुल सेटलमेंट ऑन नागा प्रॉब्लेम' हा रेग्युलेशन पास केला परंतु नागामधील बंडखोराचा गट प्रभावी होत चालला होता १९५६ मध्ये ब्रम्ही पंतप्रधान 'था किन' व पं नेहरु ह्यांच्या कोहीमातील जाहीर सभेतून एकजात सारे नागा निषेधार्थ उठून गेले होते.

अखेर ५५ मध्ये फिझोच्या नेतृत्वाखाली भारत सरकार विरुद्ध सर्वंकष लढाईला सुरुवात झाली ठिकठिकाणी पोष्ट ऑफिसेस, सरकारी कचेऱ्या यांच्यावर हल्ले चढविण्यात येऊ लागले. घनश्री येथे रेल्वेगाडी उडवून देण्यात आली स्वतंत्र नागा फेडरल गव्हर्नमेंटची स्थापना करण्यात आली. भारत सरकारने नागालँडमध्यें लष्कर घुसविले यावेळी भारतीय सेनेस नेहरुनी धोरण आखून दिले.

१) नागावर कोणत्याही प्रकारचे बाह्य दडपण न आणता त्यांना स्वतःच्या मनाने स्वतःची कलासंस्कृतिची उन्नती आणि विकास साधून द्यावा.

२) टोळीवाल्यांच्या जमिनी आणि जंगलातील हक्काचा आदर करावा त्यात बाध आणू नये

३) त्यांच्यातील लोकांना शिकवून त्यांचा स्वतःचा कारभार चालविण्यास तयार करावे काही काळपर्यंत बाहेरील तज्ञ आवश्यक भासतील, परन्तु त्यांचे वर्चस्व निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी.

४) त्यांच्या स्वतःच्या सामाजिक, सांस्कृतिक संघटनेद्वारे योजना अमलात आणाव्यात. त्यांचेवर आपले मार्ग लादू नयेत

५) खर्च झालेली रक्कम किंवा आकडेवारी याचा विचार न करता त्यांचा व्यक्तिगत विकास किती झाला त्यावर कामाचे यशापयश मोजावे

६) भारतीय घटनेतील ४६ व्या कलमाप्रमाणे 'सामाजिक अन्याय व शोषणापासून शेडयूल कास्ट व ट्राईब चे संरक्षण करण्याचे, ज्या आर्थिक, शैक्षणीक सवलती जाहीर करण्यात आल्या त्याचा पूर्ण फायदा त्याना द्यावा

प. नेहरुनी हे जे धोरण आखले होते. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली असती तर नागा समस्या सामोपचारानी मिटली असती. परंतु भारतीय सैन्याने ज्यामध्ये पारंपारिक विचाराचे जे जातियवादी अधिकारी आहेत त्यामुळे नागावर अनन्वित अत्याचार केले. ह्याच कारणामुळे मायकेल स्कॉटने सदैव भारतीय सैन्यावर धार धरली होती. आणि आर्मीला प्रतिरोध न करण्याची विनती जनरल नेविन ह्याना केली होती

गव्हर्नर हैदरी याची नऊ कलमी तडजोड आणि नेहरुंचे धोरण याचा फारसा उपयोग झाला नाही. नागांचे आर्थिक शोषण व राजकीय एकलकोंडेपण सपले नाही. स्वातंत्र्य पूर्व काळात आणि नंतरही अखिल भारतीय पक्षांनी नागाकडे दुर्लक्षच केले. अर्थात नागामधील अतिरेकी गटाचा जोर वाढत गेला. आणि 'स्वतंत्र नागा राष्ट्राची' घोषणा करण्यात आली

सुभाषबाबूंच्या शिष्याने झेंड-ए- फीझोने आझादहिंद सरकारच्या धर्तीवर नागा फेडरल गव्हर्नमेंटची स्थापना केली आझादहिंद सेनेच्या धर्तीवर नागा सैन्य उभे केले फीझोला सर्व नागा जमातींचा एकमुखी पाठींबा मिळाला भारतीयांचा 'द्वेष' एवढयाच समान भूमिकेवर फीझोने उझनवारी नागा जमातीचे भक्कम ऐक्य घडवले स्वतंत्र नागा राष्ट्राच्या कल्पनेकरता शेकडो तरुण नागा बलिदानास तयार झाले. याबाबतीत 'फीझोची' फक्त हिटलरशीच तुलना करता येईल. खेडया खेडयातून सभा घेऊन फीझोने व त्याच्या गटाने 'स्वतंत्र नागा राष्ट्रासाठी' नागाना उद्युक्त केले. नागा युद्ध मुव्हमेंट व नागा वुमन सोसायटचा उभारण्यात येऊन संघटनेची पाळेमुळे खोल पर्यंत रुज-विण्यात आली. चोपन्न ते सत्तावन्न या तीन वर्षांच्या कालावधित फीझोने नागांचे अनभिषीक्त साम्राज्य भोगले.

फीझोनें जेंव्हां भारत सरकारशी सर्वंकष युद्धाची मागणी केली तेंव्हां शांततावादी गट संघटनेतून बाहेर पडला या गटाने खोनामा येथील बैठकीत नागा नॅशनल कौन्सिलचा राजीनामा दिला या शांततावादी गटाचा नेता, फीझोचा एकेकाळचा घनिष्ट सहकारी व तत्ववेत्ता आणि लेफ्टनंट टी सखीर होता फुटीर गटाने नागा नॅशनल कौन्सिलची रीफॉर्मींग कमिटी बनवली आणि शांततामय लढ्यासाठी

प्रचार सुरु केला. तेव्हा फीझोच्या सहकाऱ्यानी टी सखीरचा खून पाडला।

टी साखीरच्या खुनाने शांततावादी गट दडपला गेला दरम्यान फीझोने आपली नागा नॅशनल आर्मीची स्थापना केली. नागा सैन्याची भरती अल्पावधीतच दहा हजारावर गेली. त्यामध्ये किमान एक हजार भारतीय सेनेतील रीटायर्ड सैनिक होते. नव्या रिक्रुटसना शिक्षण देण्यासाठी मोकाकचुग, तुसरगच्या डोंगराळ भागात भारत ब्रम्हदेश सीमेवर ट्रेनिंग कॅम्पस् उघडण्यात आले दुसऱ्या महायुद्धात ब्रिटीशानी दडपलेली शस्त्रास्त्रे हुडकून काढण्यात आली फार मोठ्या प्रमाणावर मणीपूर व शिलाँग येथे शस्त्रास्त्रे खरेदी करण्यात आली. युनिफॉर्म घातलेलें व कवायती शिस्तीने सपन्न झालेलें अत्याधुनिक नागा सैन्य म्हणजे जगातील टोळीवाल्यांच्या इतिहासात चमत्कार होता व हा चमत्कार एका लहान टोळीवाल्याचा ' ट्रायबल फॅसिझमने ' घडवून आणला होता

रायफल, स्टेनगन, मशिनगन्स, मॉर्टरस, हॅंडग्रेनेड आणि वायर-लेस सेट नी सज्ज असलेल्या या सैन्यात रणगाडे आणि हवाईदळ तेवढे नव्हते. या प्रचड सैन्याचा खर्च भागवण्यासाठी 'नागा फेडरल गव्हर्न-मेंट' ने जबर कर बसविले. वर्षाकाठी आठ रुपये घरकर, पन्नास पैसे नागा नॅशनल कौन्सिल टॅक्स, आठ रुपये फेडरल गव्हर्नमेंट टॅक्स, दोन रुपये ट्रायबल कौन्सिल टॅक्स आणि या व्यतिरिक्त भारत सरकारच्या नोकरीतील नागांना उत्पन्नाचे १० टक्के व खाजगी धदेवाल्याना काय घातल्या २५ टक्के हिस्सा कर रूपाने द्यावा लागे नागा स्वखुषीने टॅक्स देत तर इतर जीवाच्या भितीने टॅक्स देत. अशारीतीने नागा फेडरल गव्हर्नमेन्ट वर्षाकाठी पधरा ते वीस लाख रूपये उत्पन्न मिळवी आणि भारत-ब्रम्हदेश सीमेवरील नागा प्रदेशात हे प्रतिसरकार खऱ्या अर्थाने अधिकृत सरकार म्हणून कामकाज चालवी.

भारत सरकार विरुद्धच्या लढाईत नागाना एकट्याने लढणें अशक्यच होते म्हणून फीझोने एका बाजूस परकीय मदत मिळवून लढा चालू ठेवणें आणि दुसऱ्या बाजूने नागा प्रश्न आंतरराष्ट्रीय चव्हाट्यावर मांडून भारत सरकारवर लोकमताचे दडपण आणणें असा डाव मांडला 'नागा प्रश्न' आंतरराष्ट्रीय चव्हाट्यावर मांडावयाचा प्रयत्न फीझोने 'मायकेल स्कॉटच्या सहाय्याने केले परंतु त्यात त्याला अपयश आले परकीय मदत मिळविण्यासाठी फीझोने कलकत्ता व दिल्ली येथील नागा विद्यार्थ्यांच्या सहाय्याने चिनी व पाक वकीलाशी संबंध जोडले. आणि त्यात त्याला यश आले पाकीस्तानने राजकीय स्वार्था साठी का होईना पण मदतीचा हात पुढे केला. ही मदत भारतीय चलन व दारूगोळा या दुहेरी स्वरुपात मिळणार होती. भारत–पाक सीमेवर नागा जनरल्स व पाक अधिकारी याच्या बैठकी भरु लागल्या. आणि नागा सैन्याला पाकीस्तानी तळावर शिक्षण देण्याची व्यवस्था कर–ण्यात आली

या काळात नागांनी माजी ब्रिटीश मेजर जेंझर्ड भारतामध्ये स्थानिक झालेला, भारत–ब्रम्ही सीमाची दुसऱ्या महायुद्धात चांगली माहिती मिळवलेला ब्रिटीश अधिकारी होता. मेजर जेंझर्डने नागालँड बर्मा-पाकिस्तान असा सुरक्षित आणि चोरटा मार्ग नागा सैन्याला दाखवला आणि याच मार्गाने नागा फेडरल गव्हर्नमेंट व पाकिस्तानी अधिकारी याचे राजरोस दळणवळण सुरु झाले मेजर जेंझर्ड आणि फीझो व मायकेल स्कॉट यांचे नियमीत पत्रव्यवहार चालत असत भारतीय हेरखात्याला जेंझर्डचा पत्ता लागताच त्याला अटक करण्यात आली.

मायकेल स्कॉटने नागांकडे सदोदित झुकते माप टाकल्याने व जेंझर्डने केलेल्या मदतीचे तसेच इंग्लंडने फीझोला दिलेल्या आश्रयाने

ब्रिटीशांवर या बंडाबाबत ठपका ठेवण्यात येतो – परंतु भारताला चीनशी झुंजवू इच्छिणारे नागासारख्या छोटया जमातीला मदत करतील हे असंभवनीय किंवा धांदात खोटे आहे ' स्वतंत्र नागालँड ' ही कल्पना सायमन कमिशन पासून पुढे आली असताना तसेच लॉर्ड कुप्लेनने 'क्राउन कॉलनीची' कल्पना मांडली असताना ब्रिटीशांनी त्याकडे दुर्लक्ष केले यावरूनच ब्रिटन वा अमेरिका यांचा ' नागालॅण्ड मध्ये काहीही राजकीय स्वार्थ नव्हता हे स्पष्ट होते इंग्लंडने फीझोला जो राजाश्रय दिला तोही एक आंतरराष्ट्रीय उपचार या पलीकडे महत्वाचा नव्हता. असा आश्रय नेहरूंनी दलाई लामालाही दिला होता मेजर जेंझडेने नागांना जी मदत केली तीही नागाशी त्याचे असलेले वैयक्तिक हीतसंबंध हेच कारण होते मायकेल स्कॉट हा आफ्रीकेपासून भारतापर्यंत सर्वत्र टोळीवाल्याची बाजू घेणारा मिशनरी असल्याने त्यानेसुध्दा नागाची बाजू सदोदित घेतली म्हणून काकतालीन न्यायाने ' नागाच्या बंडामागे ' आंतरराष्ट्रीय कटाचा संबंध नव्याने जोडणे म्हणजे ' नागा समस्येला ' वगल देणेंच होय

कोहीमा येथील 'नॅशनल हायस्कुल' हे बंडखोराचे प्रमुख केन्द्रच बनले होते. धाडसी व कर्तुत्ववान नागा तरुणानी नागा फेडरल सर–कारला आय. सी एस अधिकाऱ्याच्या कुशलतेने शासकीय यंत्रणा उभारण्यात मदत केली नागा सरकारची विविध खाती व त्याचे मंत्री ठरवले गेले सैन्यातही ब्रिटीश सैन्याचे धर्तीवर जनरल, मेजर आदी हुद्दे निर्माण करण्यात आले हे सर्व पाहिले की नागा हे स्वतंत्र राष्ट्र चालवण्यास योग्य आहेत याची खात्री पटते पाकीस्तानने मदतीचा हात पुढे करताच छोटया गटाने नागा सैन्य लष्करी प्रशिक्षणासाठी पाकीस्तानात जाऊ लागले. दोन वर्षाच्या अवधित तेराशे नागा पाकीस्तान मधून लष्करी प्रशिक्षण घेऊन आले.

द दाओ अन् चर्चबेल्स

मराठी ... ग्रंथालय ... पुणे
दे. क्र.

नागा सैन्याने छप्पन पासून युध्दास सुरवात केली त्याबरोबर प्रचंड भारतीय सैन्य व पोलीस नागालॅंडमध्ये घुसविण्यात आले नागा सैन्याने गनिमी कावा स्विकारला स्नॅपींग करणें, ॲम्बुश करणें, सक्तिने करवसूली करणे, विरोध करणाऱ्यांना दंड करणें, छापे घालून भारतीय अधिकारी पळवून त्यांचे बदली आपले अधिकारी सोडवून घेणें आणि सर्वत्र भारतीय शासन व्यवस्थेवर हल्ला चढविणें हे प्रकार घडू लागले धनसिरी येथे एक लष्करी रेल्वेगाडी नागांनी बॉम्बस्नी उडवून दिली व शेकडो माणसे मारलीं.

नागांचे बंड मोडण्यासाठी आलेल्या सैन्याने नेहरुंचे नियम चक्क धाब्यावर बसवले व ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी उभारलेल्या व पोसलेल्या भारतीय सैन्याने एखाद्या साम्राज्यवादी सैन्याप्रमाणें नागांचा नायनाट आरंभला. या काळात भारतीय सेनेने प्रामुख्याने शीख रेजीमेंटने जे अमानुष अत्याचार केले त्याची नोंद काळ्या अक्षरातच करावी लागेल भारतीय सैन्याने जे अत्याचार केले त्याची जाणीव खुद्द भारत सरकारलाही आहे म्हणूनच 'नागालॅंड' मध्ये प्रवेश मुक्त न ठेवून या साऱ्या गोष्टी दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

चर्च पुढाऱ्यानीं आणि मायकेल स्कॉटने भारतीय सैन्याच्या या अत्याचाराविरूद्ध आवाज उठवला परंतु त्याना व्यवस्थितपणें 'राष्ट्रद्रोही असे बदनाम करुन त्याचा आवाज दाबण्यात आला. परंतु याने परिस्थिती पालटत नाही 'जेथे द्वेषाची जखम खोलवर गेली आहे तेथे तह अशक्य होतो' आणि आज हेच नागाबाबत घडले आहे

भारतीय सैन्याने संपूर्ण नागालॅण्ड मध्यें लष्करी कायदा पुकारला ज्या पद्धतीने मलेशियातील क्रांतिकारक उठाव ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी दडपले त्याच पद्धतीने भारतीय सैन्याने 'नागा बंड'

मोडण्याचा प्रयत्न केला प्रत्येक गावाला वेढा घालण्यात आला. गावातून जाणाऱ्या येणाऱ्याची प्रत्येकाची झडती घेण्यात येऊ लागली केवळ संशयावरुन शेकडो लोकांना अटक करण्यात आली. कित्येकांना चौकशीविना ठार मारुन दहशत बसविण्यात आली गावातील प्रत्येक घराची झडती करण्यात येऊ लागली व अशारितीने नागा भूमिगत सैन्याला एकटे पाडण्यात आले, नंतर जंगल ऑपरेशन्स सुरु करुन नागांचा वंश निपातच करण्याचा विडा उचलण्यात आला भारतीय सैन्याच्या संख्येपुढे नागा टिकू शकले नाहीत शेवटी केवळ जीव बचावणें एवढाच नागा सैन्याचा कार्यक्रम झाला भारतीय सैन्याच्या मारापासून वाचण्यासाठी ब्रम्हदेशात व ब्रम्हीसैन्याचा मार चुकविण्यासाठी भारतात अशी त्यांची भारत–ब्रम्हदेश सीमेवर पळापळ सुरु झाली.

नागांच्या स्वतंत्र राष्ट्राच्या घोषणेने चवताळलेले भारत ब्रम्ही सत्ताधारी नागा समस्या सोडविण्यासाठी एकत्र येण्याऐवजी नागांचा नाश करण्यासाठी एकत्र आले आणि नागा सैन्याची ससेहोलपट चालू केली ही ससेहोलपट थाबविण्यासाठी मायकेल स्कॉटने नेहरुंना वेळोवेळी पत्रे लिहून सैन्याने चालवलेले अत्याचार थाबविण्याचें प्रयत्न केले ब्रम्ही पतप्रधान उनू यांना पत्र पाठवून नागा सैन्य विरुद्ध लष्करी कारवाया थाबविण्याची विनती केली होती. परंतु मायकेल स्कॉटच्या या प्रयत्नाची वासलात लावण्यात आली

सशस्त्र बडाचा भडका झाल्यानतर पराभूत नागा भूमिगत झाले व त्यांनी छुपे हल्ले चढवून भारतीय सैन्याला हैराण करावयास सुरूवात केली प्रत्यक्ष लढाईत पराभव पत्करावा लागल्याने नागांमध्ये दुफळी पडली. फिझोची लोकप्रियता ओसरु लागली तेव्हा अखेरचा प्रयत्न म्हणून फिझो नागा समस्या आतंरराष्ट्रीय चव्हाट्यावर मांड–

ण्यासाठी लंडनला निघून गेला सशस्त्र बंड अपयशी झाल्यानंतर नागाच्या राजकारणात संसदीय राजकारणाचे पर्व सुरू झाले. भारतीय सत्ताधाऱ्यांपासून कमाई झालेले नवे वर्ग नागांमध्ये निर्माण झाले. मध्यम वर्गीय नेतृत्वाने सत्तेसाठी भारत सरकारशी तडजोड करून नागा बंडखोरांना एकटे पाडले नागांमध्ये नवे वर्ग – नवा स्वार्थ निर्माण झाला आणि ट्रायबल फॅसिझम संपुष्टात आला

अशारितीने नागा बंडाचा क्रूर शेवट करण्यात आल्यानंतर भारतीय सत्ताधारी मानभावीपणे पीस कमिशनची स्थापना करुन त्या पीस कमिशनमध्ये एकही नागा नेता न घेता स्वतःच्या शांततामय धोरणाचा ठराविक डंका बडविण्यास सुरवात केली.

नागा हिल्स, मिझो हिल्स प्रमाणेंच खासी हिल्स, जेरीया हिल्स, लुशाई हिल्स मधील साऱ्याच आदीवासी जमातीच्या प्रश्नाकडे सतत दुर्लक्ष झाले आहे केव्हातरी या टोळ्या बंड करुन उठतील खापर मिशनऱ्यावर फोडण्यात येईल टोळीवाल्यांच्या नरमेधावर जातीय राष्ट्रवाद पोसावयाचा व्यापारी बगलबच्चे प्रयत्न करतील. आणि हे लुच्चे सरकार पुन्हा सर्वोदयवादी किंवा तत्सम मानवतावाद्यांची पुण्याई खर्ची घालून हात झटकून मोकळा होईल.

सर्वोदयवाद्यांची पुण्याई स्वतःच्या राजकारणा करता खर्ची घालायची एक चांगली कला भारत सरकारने अवगत केली आहे. सर्वात प्रथम तेलंगणातला असंतोष दबविण्यासाठी विनोबाची पायपीट कामी लावली आणि आता डॉ. आरम्, जयप्रकाश नारायण यांच्याबद्दलचा आदरभाव पणाला लावून नागाप्रश्न भिजत ठेवण्यात सरकारने चतुराई दाखवली.

डॉ आरम् गेले तप या नागभूमीत सेवाव्रत चालवीत आहेत. जे मिशन कपाऊड नागा भूमिगतांचे प्रमुख केंद्र झाले होते. – ज्या मिशन कपाऊडमध्ये टी साखीर सारख्या तडजोडवाद्याचा खून झाला होता. त्याच मिशन कपाऊडमध्ये डॉ आरम् शांतचित्ताने निशस्त्र राहतात. 'भारतीय' असूनही ! डॉ आरम् हे नाव साऱ्या नागाभूमीत प्रसिद्ध आहे. जर भारतीय माणूस नागांशी आरम् यांच्या भातृवृत्तीने वागला असता तर आज ही बडाची वेळच आली नसती.

सर्वोदयवाद्यांनी आजपर्यंत स्वतःच्या कळत नकळत या सरकारला मदत केली आहे सर्वोदयवाद्यानी यापुढे प्रस्थापित वर्गीय सरकार विरुद्ध आपले हत्यार उचलले नाही तर सर्वोदयवाद्याची भारतीय राजकीय इतिहासात भाडवलशाहीचे हस्तक अशीच नोंद होईल सर्वोदयाच्या प्रभावाचा, शक्तीचा कोणी गैर वापर करुन घेऊ पहात असेल तर तसा तो होऊ न देण्याबाबत सर्वोदयवाद्यानी जागरूक राहीले पाहीजें ठाणें जिल्ह्यात सरकारविरुध्द लढून सर्वोदयवादी कार्यकर्ता तुरुगात जातो तेव्हां तो कोसाकोसाच्या पदयात्रेपेक्षा – बौद्धीकांपेक्षा जास्त काही करून जातो याउलट तोच नेता जेव्हां आंध्रमध्ये जनतेच्या चळवळीविरुद्ध – भूमिहीनाच्या लढ्याविरूद्ध सरकारला सरक्षण देऊ पाहतो. तेव्हा तो जनतेपासून अलग पडतो जनताद्रोही–क्रांतिद्रोही ठरतो

'पीस कमिशन' हे एक मोठे ढोंग होते प्रत्यक्षात मात्र अमानुष दडपशाही करून नागा बंड चिरडल्यानतर तो एक सोज्वळतेचा देखावा होता 'पीस कमिशनची' आवश्यकता युध्दकाळात होती पण रेडक्रॉस सारख्या सस्थेइतका सुद्धा प्रामाणिक हेतु नसलेल्या 'पीस कमिशनने' नागाना घोळवत ठेवून–फुटीर नागाना सघटीत करण्याचे काम केले. पिस कमिशन' हे भारतीय सत्ताधाऱ्यांची कुशल खेळी होती. या खेळीमध्ये नागा फसले.

नागा नॅशनल कौन्सीलवर भारत सरकारने बंदी घातली होती परंतु कागदावरली बंदी शाई बरोबर वाळून गेली. नागा नॅशनल कौन्सील हा नागा जमातीचा अविभाज्य घटक होता तेव्हा ' नागा नॅशनल कौन्सील हा नागा जमातीचा अविभाज्य घटक होता तेव्हा ' नागा नॅशनल कौन्सीलला ' अधिकृतरित्या परवानगी न देता तिचे प्रतिनिधीत्व मान्य करण्यासाठी ' पीस कमिशन ' चा फसवा मार्ग काढण्यात आला. नागा भूमिगतांना वाटाघाटीच्या टेबलावर समान दर्जा देण्याऐवजी त्याना राजकीय दृष्टया बचावात्मक पवित्रा घ्यायला लावण्यात हे ' पीस मिशन ' यशस्वी झाले परिणामी तरुण नागांचा या ' पीस मिशनवरचा ' विश्वास उडाला.

० ० ०

पाच एप्रिल चवष्टला या तथाकथीत पिस मिशनची स्थापना करण्यात आली बी. पी. चार्लीहा, जयप्रकाश नारायण आणि मायकेल स्कॉट हे तिघे त्या ' पीस मिशन ' मध्ये होते. त्या ' पीस मिशन ' मध्ये नागा फेडरल गव्हर्नमेंटचा किंवा नागा शांततावादी गटाचा एकही सदस्य नव्हता. यावरूनच ते ' पीस मिशन ' कसे एकतर्फी होते हे दिसून येते. या पीस मिशनने नागा भूमिगत व सरकार यांच्या-मध्ये प्रथम अशी तडजोड घडवून आणावयाचा प्रयत्न केला की–

' नागा बंडखोरांनी आपली सारी शस्त्रास्त्रे ' पीस मिशनच्या' हवाली करावीत आणि भारत सरकारनेही ' नागभूमितून ' सारे सैन्य काढून घ्यावे परंतु शांतता आणि सुव्यवस्थेसाठी ' राज्यात पोलीस हे राहतील '

अर्थात सशस्त्र पोलीस ठेवून नागांची शस्त्रास्त्रे काढून घणारी ही योजना नागा भूमिगतांनी फेटाळून लावली. त्यानतर सुमारे सहा महिने वाटाघाटीचा घोळ घातल्यानतर सहा सप्टेंबर चौसष्टला प्रथम युद्धबदी जाहीर झाली त्या युद्धबदीच्या करारप्रमाणें--

सिक्युरीटी फोर्सने जगल ऑपरेशन्स व भूमिगताचे कॅम्पसवर छापे घालणे थाबवणे, सिक्युरिटी फोर्सने आपले पहारे पोस्टच्या हजार यार्डापर्यंतच ठेवणें, खेडयापाडयाच्या झडत्या थाबविणे, अेरियल ॲक्शन, अटक करणें, सक्तीच्या शिक्षा देणे, आदी चिथावणीखोर कृत्ये बद करणे, त्याचप्रमाणें नागा भूमिगतांनीही 'स्नॅपींग करणे' ॲम्बुश करणे, सक्तीने करवसुली करणे थाबविणे, दड वसूल करणें, छापे घालून माणसाना पळविणे आणि भोसका-भोसकी करणे असली कृत्ये करणे थाबविणे स्वत चे युनिफॉर्म घालून गावातून न हिंडणे, सिक्युरिटी फोर्स पोस्टाच्या हजार यार्डात न हिंडणें, अटी ठरल्या. यावरुन नागांचा जोर किती होता हे स्पष्ट होते. युद्धबदीनतर नेहमी-प्रमाणेच कृतिशून्य वाटाघाटीचे चर्‍हाट सुरु झाले. बी पी. चालीहा हा काही झाले तरी सरकारातील माणूस जयप्रकाशजी हिंदुस्थानी येऊन जाऊन मायकेल स्कॉट तेवढा नागाच्या बाबतीत जागरूक 'मायकेल स्कॉटला पचमस्तभी ठरवून देण्यात आले बी. पी. आणि जयप्रकाशजी यांनी पीस मिशनचा राजीनामा दिला आणि पिस मिशनचे अवतार कार्य सपले

पीस मिशनचा खेळ सपल्यानतर 'बाप्टीस्ट चर्च कौसलिने' शांततेसाठी पुढाकार घेऊन पीस कमिशनची स्थापना केली त्या कमिशनमध्ये सहा सदस्य होते परतु बाप्टीस्ट चर्च कौन्सिल विषयी साशक असलेल्या भारत सरकारने कमिशनला कधीच पीस मीश-नचा दर्जा दिला नाही त्यामुळे स्वत च्या पादऱ्या गाडीतून प्रवास

करणे आणि शांततेचा केविलवाणा प्रयत्न करणे एवढेच पीस कमिशनचे कार्य झाले

ज्या चर्चच्या नावाने हिंदु जातीयवादी शखध्वनी करतात त्या चर्च पुढाऱ्यानी प्रथमपासूनच नागा भूमितील शांततेसाठी प्रयत्न केले नागा भूमिगत व सरकार याचेमध्ये दुवा जोडणा बॅप्टीस्ट चर्चने पुढाकार घेऊन कोहिमा येथील परीषदेद्वारे नागाना शांतताप्य मार्ग स्वीकारायला लावण्याचा प्रयत्न केला. पीसकमिशन स्थापून शांततेसाठी स्वत मार्ग काढावयाचा प्रयत्न केला परतु या तथाकथीत हिंदू जातीयवादी राष्ट्रवाद्यानी मात्र मिलट्री अॅक्शन घेऊन बडखोर चिरडून टाका मिशनऱ्याना हाकलून द्या या निरर्गल बडबडी पलीकडे नागपूरच्या सघस्थानावर काही केले नाही

'पीस मिशन काय किंवा बॅप्टीस्ट चर्चचे पीस कमिशन काय दोन्ही प्रयत्न नागा समस्या शांततेने सोडविण्यात अपयशी ठरले कारण त्याला भारत सरकारने अधिकृत मान्यता कधीच दिली नाही, त्यामुळे 'पीस कमिशन' चर्चच्या सद्भावनेचे केवळ प्रतिक मात्र ठरले. राजनैतिक पातळीवर हालचाल करणे कमिशनला जमलेच नाही.

पिस मिशनची गोष्ट जरा वेगळी. पीस मिशनला भारत सरकारची मान्यता होती पण त्यात बडखोर नागा सरकारचा एकही प्रतिनिधी नव्हता.

'पीस मिशनचे' तीन्ही सदस्य नागा जीवनापासून बरेच दूर होते. त्यांचे हेतुही फारसे विशुद्ध नव्हते आणि म्हणूनच 'पीस मिशन' नागा समस्या सोडविण्याबाबत अपयशी ठरले. परतु या अपयशातही भारत सरकारचा 'राजनैतिक' विजय भरलेला आहेच.

मायकेल स्कॉट,

पीस मिशनचा सर्वात बदनाम सदस्य. राजनैतिक शहाणपणा अभावी गोंधळून, दोलायमान स्वभावाच्या बनलेल्या या सच्च्या मानवतावाद्याची नागा प्रकरणी दारुण शोकांतिका झाली. पाहुणा म्हणून बोलवला गेला आणि पंचमस्तंभीय समजून हाकलला गेला. मुळात द. आफ्रिकेतील वंशद्वेषी अत्याचारांना 'ए टाईम टू स्पीक' या पुस्तकाद्वारे वाचा फोडून जगप्रसिद्ध झालेला ख्रिश्चन मिशनरी मायकेल स्कॉट हा या प्रकरणात उगीच अगांतुका सारखा येऊन टपकला. संयुक्त राष्ट्रसंघात दक्षिण आफ्रिकेचा आवाज उठवून जगन्मान्य झालेल्या या इसमाचे शब्दास आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा लाभलेली होती. त्याने दक्षिण आफ्रिकेतील काळ्या जनतेचे प्रश्न मांडण्याची मोठी कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली परंतु नागांचे बाबतीत त्याला अपयश आले कारण दक्षिण आफ्रिकेत गोरेतर जनते बरोबर तो राहिला होता त्याचे हालचालीचे राजकिय भांडवल करण्यात येत नव्हते. या उलट भारतामध्ये तो शांतिदूताचा अवतार घेऊन आला आणि आल्या आल्या नागांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी ख्रिश्चन मिशनऱ्यांचा आधार घेतला. इथेच त्याने पहिली घोडचूक केली. त्याच्या या कृत्याचे राजकिय भांडवल करुन येथील जातीयवाद्यांनी त्याला पुरते बदनाम केले. त्यानंतर मायकेल स्कॉटने वरीष्ठ पातळीवर चर्चासत्रे, बैठका चालू ठेवल्याने तो नागा टोळीवाल्यांपर्यंत जाऊन पोहोचू शकला नाही. नागा जमातीचा संहार टाळण्यासाठी भारताविरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारुन आणि कित्येकदा नागा सैन्याला मदत करुन स्वतःचे अलिप्ततेचे धोरण त्याने सोडले त्याच्या या दिशाहिन आणि धरसोड वृत्तीने नागाहि त्याचेवर विश्वास ठेवीनासे झाले. आणि भारत सरकारने चक्क त्याला बदनाम करुन हाकलून दिले अखेर शांततेसाठी केवळ सेवाभाव आणि सदिच्छा पुरत नाहीत, आवश्यक ते राजनैतिक शहाणपणही लागते हेच खरे !

'पीस मिशनचे' दुसरे सदस्य जयप्रकाश नारायण. एक तर सर्वोदयवादावर हिंदुधर्म आणि राष्ट्रवादाचे परिणाम शिल्लक असल्याने ते नागांना न्याय देऊ शकत नाहीत. तसेच गांधीवादासाठी आवश्यक ती ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी नागांना नसल्याने तो त्यांचे गळी उतरत नाही आणि जयप्रकाशजी गांधीवाद त्यांचे गळी उतरावयाचा प्रयत्न करीत होते जयप्रकाशजींची भूमिका भारताचे हितसंबंध राखणारा 'समेट' अशी होती, तर नागा नेत्यांना स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र हवे होते 'पीस मिशन' स्थापन करण्यासाठी लागणारी तडजोडीची वृत्ती दोन्ही पक्षात नव्हती आणि म्हणूनच 'पीस मिशनचा' स्वतःचे फायद्यासाठी दोन्ही बाजूनी उपयोग करण्यात आला तिसरे सदस्य बी. पी, चालीहा एक आसामी आणि त्यात मुख्यमंत्री म्हणूनच स्वतंत्र नागाराष्ट्र ही कल्पना स्वप्नातही मान्य करण्यासारखी नव्हती थोडक्यात 'पीस मिशन' म्हणजे रक्तपात टाळू पाहणारी आणि युद्धबंदी घडून आणणारी कमिटी झाली तिचा प्रश्न सोडवण्यास काहीही उपयोग झाला नाही 'पीस मिशन नंतर 'पीस कमिशन' स्थापले गेले बॅप्टीस्ट चर्चच्या या 'पीस कमिशनला' मान्यता कधीच मिळाली नव्हती म्हणूनच तेही असफल झाले अशा रितीने शांततेचे सर्व प्रयत्न फसून 'सत्ता ही बंदुकीच्या नळीतून जन्म घेते. हे माओचे विधान सत्य ठरले आणि भारतीय सैन्याचे जोरावर नागालँड भारताचा अविभाज्य घटक ठरला।

अंतर्गत जमातीचे राजकारण आणि फिझोचा पराभव यानें नागाच्या एकजुटीला फार मोठे खिंडार पडले. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत जे घडले त्याची पुनरावृत्ती नागालँडमध्ये झाली. स्वतःचे मागण्यांचे पूर्ततेसाठी शांततामय मार्ग व तडजोडीचे धोरण स्विकारण्यात आले नागांच्या या नव्या मवाळ नेतृत्वाने चार टप्प्यात यश मिळविले

डी सॅकेरे बरोबर बाहेर पडलेल्या शांततावादी गटाने 'नागा नॅशनल' कौन्सिलची रिफॉर्मींग कमिटी बनवून निवडणुका लढविल्या आणि तीन आमदार विधान सभेत पाठविले त्यानंतर २२ मार्च सत्तावनला आओनी कोहीमा येथे शांतता मिरवणूक काढून एक नवे पर्व सुरू केले आआ—सेमा—लोय'—अगामी व चेथकसांग जमातीमध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शांततेसाठी आवाहन करणाऱ्या सभा खेडोपाडी घेतल्या आणि याच वातावरणात १२ ऑगस्ट सत्तावनला काहीची येथे शांतता परिषद भरली या परिषदेला सतराशेच्या वर सभासद आले होते या परिषदेने पन्नास जणाची समिती नेमली या समितीने केलेला ठराव परिषदेने मान्य केला त्या ठरावात म्हटले होते——

'१९२१ मध्ये आसाम मध्ये तुरानसग व नागाहील्स मधली जगले पुन्हा नागा जिल्ह्यात आणून हा सर्वभाग एकाच शासन यंत्रणेखाली आणावा व ह्या भागाचा कारभार परराष्ट्र व्यवहार खात्याकडे सोपवावा —आणि नागा समस्येबाबत भारतीय संघ राज्यांतर्गत तडजोड घडवावी.

याच परिषदेने नऊ जणाचे शिष्टमंडळ पंडीत नेहरूंच्या भेटीस पाठविले. सत्तावीस सप्टेंबर सत्तावनला नेहरूनी या शिष्टमंडळाची भेट घेऊन नागा चळवळीला लागलेले शांततामय वळण पाहून उदार धोरण स्विकारले

'डिसेंबर सत्तावनला सर्व जगले नागाहीलमध्ये घालण्यात आली आणि N H T A हा नवा प्रांत तयार करून त्याचा कारभार मिनीस्ट्री ऑफ एस्कटर्नल अफेअर्सकडे सोपविण्यात आल आणि भूमिगताना अभयदान जाहीर करण्यांत आले.

भारत सरकारच्या या धोरणाने पहिल्या अधिवेशनाची उद्दीष्टे सफल झाली आणि भूमिगत नागा संघटनेला फार मोठ्या प्रमाणावर गळती लागली आणि शांततावादी गटाने दुसरे अधिवेशन २१ मे ५८ ला मोकाकचुंग जिल्ह्यातील उगमा या गावी बोलावले. हे अधिवेशन भरू नये म्हणून 'नागा बंडखोरांनी' धमक्या दिल्या आणि गावावर पन्नास हजारांचा दंड बसविला तरीही हे अधिवेशन भरले या अधिवेशनाला सत्ताविसशेचे वर प्रतिनिधी जमले होते या अधिवेशनात तीन ठराव करण्यात आले –

(१) कोहीमा अधिवेशनाचे ठराव अमलात आणल्याबद्दल सरकारचे अभिनंदन.

(२) सर्व प्रकारच्या हिंसेचा, डावपेचांचा, सशस्त्र हल्ल्याचा निषेध.

(३) अभयदानाची मुदत वाढविण्याची विनंती

मात्र अधिवेशनात आठ सभासदांची कमिटी नेमण्यात आली तिचेकडे भूमिगत बंडखोरांशी शांततामय वाटाघाटी करण्याचे काम सोपविण्यात आले

आक्टोबर ५९ ला या शांततावादी गटाचे तिसरे अधिवेशन 'मोकाकचुंग' येथे भरलें त्या अधिवेशनात १६ मुद्द्यांचा मसुदा तयार करण्यात येऊन सरकारकडे पाठविण्यात आला या अधिवेशनाने– भारतीय संघराज्यांतर्गत स्वतंत्र नागा राज्यांची मागणी केली केंद्रीय सभागृहात नागांना प्रतिनिधीत्व मागण्यात आलें – शेजारील प्रगतीशील नागांना नागा राज्यात विलीन व्हायची परवानगी आणि राज्याचे विकासासाठी केंद्रीय मदत मागविण्यात आली त्याच बरोबर भारतीय लष्करात स्वतंत्र नागा रेजिमेन्ट तयार करावी अशी मागणी केली.

भारत सरकारने १ ऑगस्ट १९६० ला लोकसभेत स्वतंत्र नागा राज्याची घोषणा केली आणि तीन वर्षानंतर १ डिसेंबर त्रेसष्ट ला 'नागाराज्य' अस्तित्वात आले. या राज्याचा उद्घाटन समारंभ राष्ट्रपती राधाकृष्णन यांनी केला. आपल्या भाषणात ते म्हणाले---

'शौर्यशाली नागा जमातीला उज्वल भविष्यकाल आहे!

जानेवारीच्या मध्याला निवडणुका झाल्या शांततावादी नागा नॅशनल ऑर्गनायझेशनने ३३ जागा तर क्रांतिकारकांविषयी सहानुभूति असलेल्या नॅशनल डेमोक्रॅटीक पार्टीने ११ जागा मिळविल्या परंतु खरच नागाचा भविष्यकाल उज्वल ठरला काय ?

बिलकूल नाही. उलट मग नवेच वाद निर्माण झाले भाषावार प्रांतरचनेनंतर राज्याराज्यात जसे सीमा संघर्ष उदभवले तसेच नागा-राज्याचेही इतर राज्याबरोबर उभे राहीले पण नागालॅण्डचे एकंदर राजकारणच बंदूकीच्या नळीवर तोलले जाते आसामशी नागा-राज्याचा सीमा संघर्ष येताच दोन शत्रूराष्ट्रांची सेनादले एकमेका-विरुध्द उभी ठाकावीत तशी नागा पोलीस दल व आसाम पोलीसदल जून ७१ मध्ये शिवसागर जिल्ह्यात उभी ठाकली त्यावेळी राज्य आणि केंद्र पातळीवर तातडीने हालचाली झाल्या म्हणून सशस्त्र संघर्ष टळला नसता भारतीय संघराज्याची दोन घटकराज्ये परस्पराविरुध्द युध्द पुकारुन मोकळी झाली असती.

१९२५ साली ब्रिटीशांनी कारभाराच्या सोयीसाठी आसामची सीमा आखताना नागालॅण्डची बरीच तुकडेमोड केली नागालॅण्डचा बराच भाग मणीपूरच्या उखरुल सबडिव्हिजनमध्ये, नेफाच्या जिराप डिव्हिजनमध्ये आसामच्या शिवसागर जिल्ह्यातील जंगल भागात ब्रिटीशांनी समाविष्ट करुन टाकला. त्यात पुन्हा स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने नागा नॅशनल कौन्सीलशी सल्लामसलत न करता नागा लॅण्डचा बराच भाग ब्रम्हदेशाला देऊन टाकला.. नागालॅण्डच्या या

लाडगेनोझीने नागा टोळीवाले आधीच अतिशय संतप्त बनले आहेत. त्यात पुन्हा नागा बंडखोरांनी "स्वतंत्र नागा राज्याची' घोषणा केलेली अर्थातच नागा राज्य सरकारवर नागा बंडखोराच्या या धोरणाचा दबाव हा येतोच त्यामुळें नागाराज्य सरकारही सीमा प्रश्नावरून इरेला पेटते.

नागालँण्डचा राजकीय इतिहास पाहता नागाराज्याच्या सीमाचा प्रश्न भिजत घोंगडयात टाकणे इष्ट नव्हे. म्हैसूर-महाराष्ट्र सीमेप्रमाणें तो वर्षेनवर्षे नुसता भिजत पडणार नाही उलट केव्हाही पटकन कापरा सारखा पेट घेईल पण आजपर्यंत सरकारने नागाराज्य सीमा प्रश्न सोडवलेला नाही

या सीमा प्रश्नावरून तर पुन्हा नवीन राजकीय शोकातीका उभी राहणार नाहीना ?

अखेर राष्ट्रवाद ही राजकीय भावना आहे तिला भौतिक जिवनापेक्षा वेगळे स्वतंत्र अस्तित्व नाही आणि नागाचे जिवन मात्र जसें होते तसेच आहे किंबहुना स्वातंत्र्योत्तर काळात भारतात जे घडले तेच 'नागालँड' मध्येही घडत आहे असंतुष्ट वातावरण अजूनही आहे म्हणूनच वरकरणी शांततेचा मुलामा चढलेला असताना मे ला आलेल्या बायईलेक्शनवर नागा बंडखोरांनी सशस्त्र हल्ला चढविला —दिमापूरात दंगल घडली

अखेर जोपर्यंत शासनसत्ता जनतेमधून निर्माण होत नाही. तोपर्यंत ती पिळवणूक करणाऱ्या वर्गाचीच पाठीराखी राहते. स्वातंत्र्यानंतरही भारत सरकार साम्राज्यवादी आणि भांडवलदारी आर्थिक हितसंबंध जपत आले आहे–तोच कित्ता नागालँड मध्यें नव्या बोरूनें नव्या अक्षरात गिरविला जात आहे

कळजलेल्या अंतःकरणासारखेच धुराने आभाळही काजळले होते. मिटर गेज धावपट्टीवर गाडी कधी वेगच घेत नाही. एक कंटाळवाणा प्रवास. जसा काही नागाचा इतिहास. शेजारी सैनिक गप्पा मारताहेत. भारताला जाणाऱ्या त्यांचा आनंद या कंटाळवाण्या प्रवासाला रम्य करतो. दुरावाची जाणीव तळापासून तर आजची शांतताही बरवर !

डॉ. वेरीयर एल्वीन यांचे 'नागाज इन–नाईंटींथ सेंच्युरी' हे पुस्तक वाचावयाला घेतले. डॉ. वेरेयर एल्वीन हा ब्रिटीश कारकिर्दीत नेफा विभागातील एक अधिकारी होता. भारतातील शतराहून अधिक टोळीवाल्यांचे जिवनावर सखोल आणि सहानुभूतिपूर्ण विवेचन त्यांनी केले आहे. 'नागाज इन नाइंटींथ सेंच्यूरी' आणि 'नागालँड' ही त्यांची पुस्तके म्हणजे नागा जीवनाचे महाभारत आहे.

––माणूस जेंव्हा जागा होतो तेव्हा त्याची राजकीय बंधने तुटून पडतात हेच खरे !

जीवाच्या आकांताने त्या 'मीटरगेज इंजिनाने' शिटी फुकली. खडबडून जागा झालो. गाडी धनसिरी मागे टाकीत होती. नागालँडचा प्रवास संपला. काचाराच्या राजधानीत तीन आठवडे भूतकाळात नांदत होतो. पुन्हा वर्तमानात आलो होतो. आसामात आलो होतो.

तीन आठवड्याच्या मुक्कामात दोन सल सललें. चार अनुभव आनंद देऊन गेले. नागालॅण्डमध्ये जाऊनही दिमापूरचे पुढे जाता आले नाही. यामे देवळात जाऊन गाभाऱ्यात प्रवेश न मिळणाऱ्या दलिताचे दुःख अनुभवाला आले.

आणि सर्वात खेद वाटला नागांविषयीच्या उपेक्षेचा. हिंदी, मराठी दोन्ही भाषात मिळून वीस कोटी लोक आहेत. पण या दोन्ही

भाषात नागा समस्येचा तपशीलवार, सुसगत इतिहास वाचायला मिळाला नाही आमच्याकडल्या लेखकाना, प्रकाशकांना कधीच कशी नागा जीवनात डोकावण्याची बुद्धी झाली नाही ? सतत वीस-पचवीस वर्षे सशस्त्र बडाळींनी पेटलेल्या सीमेवरच्या या टोळघाची उपेक्षा 'राष्ट्रवादाचा' डका बडवणाऱ्या लोकानी केली तरी कशी ? या उलट गोऱ्या साहेबांना चार गळेलठ्ठ ग्रथ नागावर लिहुन ठेवले अगदी मानववशशास्त्र दृष्टचा नागा कोण आहेत या पासून आजची समस्या काय आहे इथ पर्यंत विपूल लिहिले नाही तर आम्ही !

दोन सल सलले पण चार अनुभव देऊन गेले. एक म्हणज नागा तरुणाची स्वत च्या समाजाविषयीची निष्ठा स्कॉलरशीप राखीव जागा, कलकत्या सारख्या महानगरातील नोकरी ही आमीषे त्यांना भुलवू शकली नाहीत ग्रॅज्युएट झालेले नागा तरुण शिक्षण सपताच पुन्हा जगलमय नागालँण्डला परतले स्वतत्र सार्वभौम नागा' राज्याची स्वप्ने पहात, कदाचित मोरुग, हीलोकीतल्या सहजीवनाचा हा परिणाम असेल उलट आपल्याकडील मॅट्रीक्युलेट दलीत तरुणही कारकुनी मिळताच ब्राह्मण होतो.

नागाचे दुसरे कौतुक त्याच्या स्वाभिमानाचे वाटले. लहान पणापासून जगलात राहणाऱ्या शूर आदिवासीची जी चित्रे परीकथा· तून वाचली ती नागांच्या रूपाने प्रत्यक्ष पहायला मिळाली आपल्या" कडला वारली, भिल्ल हा, सुसस्कृत समाजापुढे लाचार गुलाम झाला वारल्याची जी चळवळ झाली ती देखील परुळेकरासारख्या बाहेरच्या पाढरपेशांनी जाऊन बाधली नागांचे उठाव मात्र त्यांच्या अतःप्रेरणे-तून जन्मले मिशनऱ्यानी त्याच्या राजकीय जाणीवेला वळण दिलें असे समजणेच चूकीचे आहे

तीन आठवड्याच्या दौऱ्यात संपूर्ण नागा समस्या समजली म्हणणे मुर्खपणाचे ठरेल हे खरे पण माझे मात्र असे मत झालें की, नागा–मिझोंचे उठाव हे समाजवादी क्रांती इतकेच अपरीहार्य आणि अटळ होते.

कोणताही मनुष्य समाज जेव्हा संस्कृतीची पहिली पायरी चढतो तेव्हा त्याच्या मनात सर्वात प्रथम राजत्वाची अपेक्षा निर्माण होते गेल्या शतकापर्यंत मॅनइटर असलेलें, आदीम साम्यवादी जीवन जगणारे नागा, चर्चबेलसच्या पहिल्या घटेने जागे होत सुसंस्कृत जीवनाची पहिली पायरी चढलें तेव्हाच त्यांच्या मनात राजत्वाची अपेक्षा निर्माण झाली. नागालॅण्ड स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगू शकणार नाही, राहू शकणार नाही हे सर्व खरे पण त्यांच्या मनात राजत्वाची भावना निर्माण होणे चूक आहे का ?

कामगार क्रांती करतो पण केव्हा ? जेव्हा तो स्वतःच्या वर्गीय संस्कृतीचे पहिले पाऊल चालतो तेव्हा त्याच्या मनात राज-त्वाची अपेक्षा निर्माण होते तेव्हाच तो 'कामगार सत्तेची' स्वप्ने पाहतो अन्यथा पगारवाढ, बोनससाठी लाचारीचे संघटीत सौदे करतो

खरे ना ?

जागा झालो – रात्रीच्या अंधारात गाडी गोहत्तीला पोचली होती लगबगीने कामाक्षी हॉटेलवर गेलो. चौकशी केली. पुण्याहुन पत्र, मनीऑर्डर काहीच आली नव्हती पोस्टात गोंधळ असावा असे समजून मटकरांना तार ठोकली हॉटेल मॅनेजरला पैसे आले तर शिलांगच्या पत्यावर रिडायरेक्ट करण्याविषयी सूचना देउन ठेवली· आणि ऐजालला जाण्यासाठी आल्या पावली स्टेशनवर परतलो –

स्टेशन बाहेर पडलो–टॅक्सीवाले उतारूची वाटच पहात होते. शिलांगला निघालो. गोहत्ती ते शिलांग केवळ ऐंशी मैल अंतर आहे परंतु स्टेट ट्रान्सपोर्ट नसल्याने खाजगी टॅक्सीवाल्याची चलती. ज्या प्रवासाला महाराष्ट्रात पांच रुपये पडत त्याला पधरा मोजावे लागले.

मध्यरात्रीची साद रातकिडे घालीत होते – सर्वच डोंगराळ

प्रदेश त्यात पावसाळा, कोसा दोन कोसाला दरड कोसळलेली असे रस्ते साफ ठेवण्यासाठी घाटात ठिकठिकाणी बुलडोझर ठेवलेले असतात. धुमासदार पावसातला हा प्रवास काळजाचे पाणी पाणी करतो. मध्येच 'वडापानी' लागते– इतका प्रचंड जलाशय आस्वानचाच असू शकेल 'बडापानी' ओलांडताना पाणी सोडलेले होते नेत्राचे पारणे फिटले

पहाटच्या अंधारात शिलाँगचं सौंदर्य लुभवत होते डोंगरात वसलेल्या या शहरात विमाने उतरूच शकत नाहीत केवळ हेलीकॉप्टरचा प्रवास – शहरात सायकली रिक्षा शोधून सापडणार नाहीत – सर्वत्र टॅक्सी

टॅक्सी केली – सारे शहर हिंडलो. वर्डलेकवर धुके तरंगत होते सप्तरंगी सिनेमे प्रत्यक्षात असतात हे पाहूनच मोहरून गेलो 'वर्डलेक' चे नैसर्गिक सौंदर्य अजून टिकले आहे झिमझिमणाऱ्या पावसात 'गव्हर्नर हाऊस' स्वित्झर्लंडच्या राजाचा राजवाडा तर इतका नसेल आणि शिलाँगचे ते जगप्रसिध्द चर्च आशियातील दुसरे समजले जाते. त्या चर्चच्या घंटानादानी जमिनीला खिळलो चर्चचा हा घंटानाद या टोळीवाल्यांच्या जीवनात बरेच काही घडवून गेला आहे. या डोंगर कपारीतून घंटानाद वर्ज केला तर शिल्लक राहतील 'भेसूर मानवी कंटचा।'

दोन दिवस लोटले पाऊस हटत नव्हता. थंडीने किती बळी घेतले असती ? ते डोंगरकडेच जाणोत अर्थात हा पाऊस नित्याचाच त्रास – पायस्थाना – नेहमीचे जीवन जगतात – पेटरस दुधडी भरून वाहतात. मेघालयाची राजधानी शिलाँग, आणि आसामची गोहत्ती. परंतु कचेऱ्याची हलवाहलव अजून व्हायचाची आहे एक गोहत्तीला पळालेलीं तर दुसरी शिलाँगलाच बुड टेकवून जनतेचे मात्र हाल.

मिझो जीवनाची माहिती करून घ्यायला पुस्तकालये धुंडाळली एकहि पुस्तक मिळाले नाही अखेर एका छोटेखानी पुस्तकालयात 'मिझो मिरॅकल' हे ख्रिश्चन सोसायटी ऑफ मद्रासने प्रसिद्ध केलेले पुस्तक सापडले पुण्याला गेल्यावर 'राष्ट्रवाद्यांची' मिशनऱ्यांवरची निरर्गल शिवीगाळ वाचायला आताच खरी मजा येणार

भारतीय राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्य कल्पनेचा उगम ब्रिटीश साम्राज्यवाद्याशी झालेल्या भारतीय सरजामदार आणि भांडवलदार यांच्या लढ्यातून झाला आहे आणि म्हणूनच जिथे पारंपारिक सरंजामशाही किंवा देशी भांडवलदार नव्हते, त्या टोळीवाल्यांच्या प्रदेशात एक राष्ट्रीयत्व आणि भारतीयांसमवेत जीवन या कल्पनेचा परिपोष झाला नाही आणि परकेपणाच्या जाणिवेतून आजचा ट्रायबल फॅसिझम जन्म पावला

नागा टोळीवाल्यांचा जो इतिहास तोच थोड्याफार फरकाने मिझो टोळीवाल्यांचा आहे आसामच्या दक्षिणेला तिन्ही बाजूंस पाकिस्तान आणि ब्रम्हदेश यानी वेढल्या गेलेल्या चिंचोळ्या पट्टीत 'लुशाई हिल्स' मध्ये मिझो टोळीवाले राहतात लुशाई टोळीवाले रहात असल्याने या डोंगराळ विभागास ब्रिटीशानी 'लुशाई हिल्स' हे नाव दिले होते परंतु प्रत्यक्षात तेथे लुशाई टोळीवाले अल्पसंख्य असून डझनावरी छोट्या छोट्या टोळ्या रहातात. हे सारे टोळीवाले स्वतःस मिझो म्हणवून घेतात आणि म्हणूनच स्वातंत्र्यानंतर सप्टे ५४ मध्ये भारतीय लोकसभेने लुशाई हील्सचे नव्याने मिझो जिल्हा म्हणून नामकरण केले

या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ८१३४ मैल असून या डोंगराळ विभागात लुसाई राल्टेस्, पाइहट्स्, पावीस, हमारस, लाखेर चाकमा आदी

टोळया राहतात. काही अपवाद सोडता या साऱ्या टोळया स्वतःस मिझो म्हणवून घेतात ६१ च्या शिरगणतीप्रमाणें मिझोंची वस्ती दोन लाख सहासष्ट हजार होती परंतु त्याशिरगणतीला चाकमा मान्यता देत नाहींत चाकमाचे म्हणण्याप्रमाणे त्यांच्या आतील भागात राहणाऱ्या अर्ध्या टोळयाची अजून मोजदादच झालेली नाही चाकमाच्या या दाव्यावरूनच तेथील दुर्गम प्रदेश आणि जंगलाची कल्पना येईल मिझोंची ही वस्ती भारत-ब्रम्हदेश-पाकिस्तान या तिन्ही प्रदेशात वसली असून या तिन्ही देशातील मिझो प्रदेश एकत्र करून स्वतंत्र मिझोराज्य स्थापन करावयाची घोषणा मिझो बंडखोरानी केली आहे

नागा टोळीवाल्यांचा इतिहास महाभारत कालापर्यंत मागे जातो परंतु मिझो मात्र अगदीच अलीकडे भारतात आले कुकी-चीन टोळीवाल्याचे वंशज सतराव्या शतकाच्या मध्याला भारतात आले-सतराव्या शतकात चाकमानी येथे येऊन वसाहती स्थापल्यानंतर एकोणीसाव्या शतकात तिप्रीस जमात चितगाव हील ट्रॅकमधून येऊन येथे स्थाईक झाली. आणि या पूर्वपरंपरेमुळेंच मिझो जवळ पारंपरिक संस्कृति आहे कांही टोळयाचे अपवाद वगळता मिझो सुसंस्कृत होते तसेच मिझोचा दळणवळणे पूर्व बंगालशीं सतत संपर्क होता त्यामुळ बंगालीचा प्रभाव त्यांचेवर होता चाकमा जमात व्यवहारात बंगाली कॅलेंडर वापरावयाची तसेच बुद्धधम आणि आदीवासी धर्मही तेथे नागापेक्षा जास्त व्यवस्थित पणे प्रचलीत होते. ब्रिटीश येण्याआधी मिझोझूम कल्टीव्हेशनवर गुजराण करीत त्याची खेडीहि स्वतंत्र

व गणराज्य पद्धतीची असत नागांच्या खेड्यात अध्यक्ष 'खोनबाओ' असे आणि त्याचे सुदेकाए व खोनसाए त्याचे सहकारी असत मिझों- मध्ये 'लाल' हा गावप्रमुख असे या मिझोंचे जीवन बगाल्याशी दळणवळणापुरते सोडून स्वतंत्र होते त्याचे हे जीवन पाहुन मार्क्सने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' मध्ये लिहिलेली प्राथमिक साम्यवादी जीवना- तील गणतंत्रे कशी खरी आहेत हेच स्पष्ट होते

या लुशाई हील्समध्ये बगालच्या पाडावानतर ब्रिटीशांनी घुस- खोरीस सुरवात केली १८८५ पासूनच ब्रिटीशांची ही आक्रमणे चालू झाली मिझोंनी प्रतिकारास सुरवात केली परतु मिझोंची शक्ति त्याच्या गावप्रमुखीतच होती. तेव्हा रेव्हेन्यू जमा करण्याच्या निमित्ताने ब्रिटीशांनी 'झुम कल्टीव्हेशनला' मर्यादा घालल्या आणि आपले कर व सारे वसूल करण्यास सुरवात करून गावप्रमुखीचे उच्चाटन केले. ब्रिटीशांच्या पाठोपाठ मिशनरी या विभागात आले आणि लवकरच सर्वत्र ख्रिश्चन धर्म पसरला. शिक्षणाचे प्रमाणही वाढले. मिझोंमध्ये नागापेक्षा शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे

पाकिस्तान– हिंदुस्थान आणि ब्रम्हदेश या तिन्ही देशातील मिझो टोळीवाल्यांचा प्रदेश स्वतंत्र करून सार्वभौम ग्रेटर मिझो राम- स्टेट स्थापन करण्यासाठी मिझो नॅशनल आर्मीने उठाव केल्यावर आम्ही जागे झालो ऐंजालवर केलेल्या हल्ल्याने सारे 'राष्ट्रवादी' एकदम मिशनऱ्यावर आणि भारतसरकारच्या नालायकीवर तोंडसुख घेऊ लागले. पण त्या आधी मिझोंचे अस्तित्व तरी या महाभागांनी ध्यानात घेतले होते काय? मिझो जिल्ह्यात एकदर जमिनीपैकी केवळ २॥ टक्के जमिन लागवडी खाली आहे आणि अजून १३ टक्के जमिन लागवडी खाली येऊ शकते पण ती आणणार कोण? फळफळावळाची समृद्धी पधरा पैशाला मिळणाऱ्या मोठ्या अननसावरुन लक्षात येईल.

पण वाहतुकीच्या अभावा ने ही संपत्ती मातीत मिळत आहे.

आधीच या विभागात दळणवळणाची साधने नसल्यात जमा, जे काही होते ते पूर्व पाकिस्तानमधुन बंगालशी होते. फाळणी नंतर हे दळणवळण संपले छोटया छोटया चीजवस्तुसाठी आसामचा प्रचंड वळसा घ्यावा लागला अर्थात याचा फायदा भारतीय व्यापाऱ्यांनी उठवला त्यात निर्वासीत आले ते मिझोंच्या जमिनी बळकावून बसले सरकारी मदत आधीच थोडी तीही कागदोपत्री- मधे खाणारी तोंडे बरीच व त्यात फास लाल फितीचा. 'ट्रायबल मिरर' मध्ये मिझो जिल्ह्यातील शाळांना वर्षानुवर्षे ग्रँट न दिल्याचा आरोप केला होता

या साऱ्या अवस्थेत ऐंजाल ते लुंगलेह हा १४० मैलाचा रस्ता मिझो टोळीवाल्यानी श्रमदानाने बांधला आपल्याकडे फर्लांगभर बांधलेल्या रस्त्याच्या उद्‌घाटनाला मंत्री येतो तिथून फक्त लष्क-राच्या गाड्या फेरी उडवीत पळू लागल्या अशा साऱ्या कोंडीतून बंडाचा स्फोट नसता झाला तरच नवल

जो इतिहास नागाचा तोच मिझोंचा जणु एकाची, दुसरी कार्बन कॉपी !

'स्वतंत्र सार्वभौम 'ग्रेटर मिझोराम स्टेटची' स्थापना करू पाहणारी मिझो नॅशनल फ्रंट ही अतिरेकी पुढाऱ्याची संघटना पाच वर्षांपूर्वी म्हणजे ६४-६५ मध्ये स्वत:च्या अस्तित्वाची दाहक जाणीव देऊन गेली ऐजालवर हल्ला झाला मिझोरामला जाणारा एकमेव रस्ता लुंगलेह-ऐजाल तोडला गेला, सरकारी खजिना लुटला गेला मिझोंच्या उठावाला सार्वत्रिक बंडाळीचे स्वरूप प्राप्त झाले

मिझोचा हा उठाव इतका प्रखर होता की, भारत सरकारला ऐंजालचा ताबा बॉबफेक करून, हवाई सैनिक उतरवून घ्यावा लागला

वस्तुत स्वतःच्याच देशाच्या प्रजाजनावर एवढा लष्करी आघात करायची वेळ आणणाऱ्या या प्रसंगानें साऱ्या देशभर प्रचंड खळबळ उडायला पाहिजे होती पण सुस्त अजगराप्रमाणें सारा देश पडून होता डोळे किलकीले करूनही 'मीझोराम' कडे पहावे असे कोणाला वाटले नाही

नागापेक्षा मिझोचा इतिहास जरा वेगळा आहे. नागानी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नागा स्वतंत्र राष्ट्र आहे म्हणून बजावले होते मिझोंच्या बाबत असे झाले नाही कुप्लेन प्लॅनप्रमाणे मिझोहील चीनहील-नागाहील 'ब्रिटिश क्राउन कॉलनीत' समाविष्ट करण्याची योजना होती. पण बहुसंख्य मिझोंनी ती धुडकावून लावली.

स्वातंत्र्यानंतर नागाप्रमाणें मिझोंनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला नाही उलट आसामच्या विधानसभेवर तीन आमदार निवडून पाठवले कॉंग्रेसला मिझोंनी पाठींबा दिला. पण स्वातंत्र्याची निराशा त्यांच्या लेखी विश्वासघातासारखी ठरली 'डिस्ट्रीक्ट कौन्सिल' सुधारण्यास मिझों-च्या समस्या सोडवण्यास संसदीय पद्धत अपेशी ठरली नी मिझोमध्यें बडखोर गट प्रभावी होऊ लागले आणि अलॅर वंडखोराचे लाल-डेंगाच्या नेतृत्वाखाली मिझोंचे भूमिगत फेडरल गव्हर्मेंट उभे राहीले. नागाच्या पद्धतीनेंच मिझोंच्या स्वातंत्र्य उठावा वळण घेतले. नॅश-नल आर्मीची स्थापना झाली.

मिझो स्वातंत्र्य युद्धासाठी चीनची मदत मिळवायला स्वत-लालडेंगा ६९ मध्ये चीनला गेला तेथे त्याला जेमतेम दहा लाख रुपये व थोडीफार शस्त्रास्त्रें देण्यात आली चीनकडून लालडेंगाच्या फार मोठ्या अपेक्षा होत्या पण त्या फोल ठरल्या नागाप्रमाणेंच मिझो

नेत्यांचेही चिनशी जमले नाही पाकीस्तानने मात्र त्या प्रमाणात मिझोंना लष्करी प्रशिक्षण व शस्त्रांस्रे बऱ्याच मोठ्या प्रमाणात पुरविली परंतु भारतीय सेनेपुढे मिझोंचा निभाव लागणें कठीणच होते नागापेक्षाही अधिक लवकर मिझो सैन्याची पळापळ सुरु झाली बर्म्ही-भारतीय दोन्ही सैन्याकडून मिझोंची कोंडी होऊ लागली

लालडेंगाने शांततेची बोलणी तडीला न्यायचे ठरवून दोघा प्रतिनिधीना पाठवले. पण काचार पोलीसानी त्या दोघांना पकडून तुरुंगात डांबले ग्रेटर मिझोराममध्ये लालडेंगाला पाकिस्तानातील मिझो भागही पाहिजे होता. अर्थातच पाकिस्तानने मिझो भारताला उपद्रव देतील पण यशस्वी होणार नाहीत एवढ्याच बेताने मदत द्यायला सुरुवात केली. चीनचे मन वळवून पुन्हा कुमक आणायला लालडेंगाने मिझोराम गव्हर्मेंटचा डिफेन्स मिनिस्टर शामविला याला ६९ ला चीनला पाठविले पण तोही हात हालवत परत आला. याच काळात मिझोराम गव्हर्मेंटच्या अर्थमंत्र्याचे ( लालखाव्लीयानाचे ) व उपाध्यक्षाचे ( लालनुनमावी याचे ) पाकिस्तानशी गंभीर मतभेद झाले. लाल डेंगा थकत गेला. अखेरीला रंगमती जवळील जंगलात फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या क्वार्टरमध्ये त्याने आपला मुक्काम ठोकला. मिझो बंडखोर गटात गंभीर दुफळी माजली अर्थमंत्र्याचे व उपाध्यक्षाने पाकिस्तानशी वाजले तरी सेनाप्रमुख ह्यालेलयुयाने पाकिस्तानशी जमवून घेतले. स्वतःच्याच सहकाऱ्यापासून लालडेंगाच्या जीवाला धोका निर्माण झाला. त्याला भेटणाऱ्याची कडक झडती घेऊनच भेट देण्यात येऊ लागली. बघता बघता मिझोंवरला लालडेंगाचा प्रभाव ओसरू लागला. शांततावादी गटाने उचल खाल्ली.

६९ च्या सुरवातीला ऐजाल येथे 'मिझो पिपल्स कन्व्हेंशन' भरलं. या कन्व्हेंशनला शंभरचेवर प्रतिनिधी जमले होते. तीस सभासदांची शांतता कमिटी नेमण्यात आली. मि. सैनघांगा यांची परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. पण सरकार व मिझो बंडखोर यांच्यात शस्त्रसंधी घडवून आणण्यात परिषदेला अपयश आले.

सैनघागाना भेटण्यासाठी आतूर होतो. ऐजालला जायला बिस्तराही बांधून ठेवला होता. पण दोन दिवस झाले तरी पुण्याहून मत्र पैशाचा काहीच पत्ता नव्हता. परतीच्या प्रवासाचेही पैसे संपू लागले तसा अपुऱ्या पैशानिशी परतीचा प्रवास सुरु केला.

मराठी पत्रकाराला असे दूरवरचे दौरे करायला मिळणे हे महद्‌भाग्याचे. मला ते मिळालेही. पण अधुरे अपुरे. नागा–मिझो समस्येवर महिन्याभराच्या वृत्तपत्रीय दृष्टीने काय प्रकाश पडणार? पण निदान नागा-मिझोंच्या समस्येला वाचा फोडण्याचे तरी श्रेय मिळवले याचे समाधान मानून निघालो.

असंतोषाची टोळधाड पडलेला सोनेरी बागांचा देश मागे पडत चालला होता. मन अस्वस्थ होते. अस्वस्थ:

दा. क.

REFBK-0021579